8/1/24

# भारतीय परंपरेतली मुळं...

## मानवमुक्तीसाठी समता व बंधुता महत्त्वाची मानणारे बुद्ध, संतपरंपरा यांच्या विचारांशी संविधानाची नाळ जुळलेली आहे ...


**संविधानभान**

"**माझ्या साऱ्या** तत्त्वज्ञानाचा सारांश तीन शब्दांत आहे : स्वातंत्र्य, समता आणि बंधुता. लोक म्हणतात ही मूल्ये मी फ्रेंच राज्यक्रांतीतून घेतली आहेत. लोक काहीही म्हणोत; मी मात्र ही तत्त्वे माझ्या गुरूकडून, गौतम बुद्धाकडून घेतली आहेत.'' डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे हे सुप्रसिद्ध विधान आहे.

याचा अर्थ बाबासाहेब आंबेडकरांचा फ्रेंच राज्यक्रांतीला किंवा पाश्चात्त्य तत्त्वज्ञानातून विचार स्वीकारण्याला विरोध होता, अशातला भाग नव्हे. बाबासाहेब बुद्धाचे बोट पकडून भारतीय परंपरेसोबत असणारी नाळ घट्ट करत होते.

'डिस्कव्हरी ऑफ इंडिया'सारखा ग्रंथ जेव्हा पं. नेहरू लिहित होते तेव्हा इथली बहुविध परंपरा समजून घेण्याचा तो एक मनोज्ञ प्रयत्न होता. भविष्याचं बांधकाम करण्याच्या दृष्टीने इतिहासाकडे पाहत असताना नेहरूंना तीन बाबी अधिक महत्त्वाच्या वाटल्या : लोकशाहीच्या अधिष्ठानावर आधारलेला समाज, सामाजिक एकोपा, एकतेच्या अखंड सांस्कृतिक सभ्यतेचा प्रवाह. या तिन्ही बाबी ऐतिहासिक परंपरेत शोधण्याचा प्रयत्न त्यांनी केला.

महात्मा गांधींनी तर भारतीय परंपरा पूर्णतः आत्मसात केली होती. 'वैष्णव जन तो तेणे कहिए'पासून ते 'रघुपति राघव राजाराम' आवडणाऱ्या गांधींनी भारतीय परंपरेची नस पकडली होती. म्हणूनच तर त्यांच्या आश्रमात सर्व धर्मांची




प्रार्थना व्हायची आणि सगळ्या धर्मांची प्रार्थना म्हणत असताना गांधींनी देव, दैव, कर्मकांड या साऱ्याला फाटा दिला होता.

थोडक्यात, स्वातंत्र्य चळवळ आणि संविधान निर्मिती प्रक्रिया यामध्ये अग्रभागी असलेले लोक भारतीय परंपरेचा गंभीरपणे विचार करत होते.

भारतीय संविधान हे जरी वसाहतवादाच्या काळात तयार झालेले असले तरी त्याची पाळंमुळं भारताच्या प्राचीन परंपरेत दिसतात. समतेची मूल्ये बौद्ध परंपरेत दिसतात. बुद्धाचा भिख्खू संघ ही लोकशाही तत्त्वांनुसार चालणारी संस्था होती. गौतम बुद्ध आणि वर्धमान महावीर यांच्या मांडणीतून अहिंसेचे आणि सहभावाचे महत्त्व ध्यानात येते. चार्वाकाने सांगितलेले तत्त्वज्ञान वैज्ञानिक दृष्टिकोनाचे महत्त्व अधोरेखित करते. वैदिक संहितांमध्ये समतेचे मूल्य नसले तरी 'सभा', 'समिती' यांसारख्या रचना अस्तित्वात होत्या. त्याहून महत्त्वाची म्हणजे बाराव्य शतकात बसवण्णांनी सांगितलेली 'अनुभवमंटप' हं रचना! अनुभवमंटप ही सार्वजनिव मंथनासाठीची जागा होती. त्या काळातील छोटीशी संसद. याचे नियम हे आपल्याल आजही अचंबित करतील असे होते 'सर्वजण समान आहेत' इथपासून आंतरजातीय विवाह आणि आंतरजाती भोजनास प्राधान्य दिले पाहिजे, इथवर सा समताधिष्ठित नियम. पुढे सोळाव्‍ शतकात तर तुकोबा सांगतातः

*" विष्णूमय जग। वैष्णवांचा धर्म।।*
*भेदाभेद भ्रम। अमंगळ।। "*

भक्ती परंपरेतील मीरा रामाचे आणि कृष्णा महात्म्य गातानाच प्रेमाची महती सांगते आणि सुफ परंपरेतला ख्वाजा मोइनुद्दीन चिश्ती सांगतो खुदाच्य दोस्तानं पृथ्वीसारखं उदार असलं पाहिजे आणि कबीर तर बाजाराच्या मधोमध उभा राहून 'ढा आखर प्रेम के' सांगत सर्वांच्या कल्याणाची मागण करतो.

रूढार्थाने कुणी याला संविधानाची मुळं आहेत असं मानणार नाही; पण या सगळ्या परंपरेच्य मुशीतच आपलं सामूहिक मानस घडलं आहे. झा उंच वाढत जातं; पण त्याची मुळं अशी खोल खोल चहूबाजूंनी पसरलेली असतात.


**- डॉ. श्रीरंजन आवटे**
poetshriranjan@gmail.com


Scanned with OKEN Scanner

# मनुस्मृतीचे दहन

**कोणत्याही विवेकी व्यक्तीचे मनुस्मृतीला समर्थन असू शकत नाही. डॉ. आंबेडकरांनी मनुस्मृती नाकारली आणि काय स्वीकारायचे हेही सांगितले.**


संविधानभान

**भारताच्या परंपरेत** संविधानाची मुळं आहेत हे खरं असलं तरीही परंपरेत साऱ्याच बाबी प्रागतिक नाहीत. भारतीय संविधान अस्तित्वात येण्यापूर्वी आणि ब्रिटिश भारतात येण्यापूर्वी सामाजिक व्यवहार परंपरेनुसार होत होते. या परंपरेला धर्मशास्त्राचे अधिष्ठान होते.

असाच हिंदू धर्मातील महत्त्वाचा एक ग्रंथ म्हणजे मनुस्मृती. वसाहतवादी इंग्रजांनी तो हिंदूंचा कायदा-ग्रंथ म्हणून मान्य केला. पण 'न स्त्री स्वातंत्र्यम अर्हति' अर्थात स्त्रियांना स्वातंत्र्य देताच कामा नये, असे हा ग्रंथ सांगत होता.

स्त्रीने बालपणामध्ये वडिलांच्या आज्ञांचे पालन केले पाहिजे, तरुणपणामध्ये पतीला आदर्श मानले पाहिजे आणि म्हातारपणी मुलांच्या धाकात राहिले पाहिजे. शूद्रांना गुलाम केले पाहिजे आणि त्यांची पात्रता ही गुलाम बनण्याची कशी आहे, हे या ग्रंथात सांगितले होते. त्याचे नैतिक समर्थन करण्याचा प्रयत्न केला होता. या ग्रंथातील गुन्हे आणि शिक्षा याबाबतचा आठवा अध्याय आक्षेपार्ह आहे. या अध्यायात एकाच गुन्ह्याकरता वर्णानुसार वेगवेगळ्या शिक्षा सांगितल्या आहेत. स्त्री आणि शूद्रांच्या कानात शिसे ओतण्यासारख्या भयंकर क्रूर शिक्षांचाही उल्लेख आहे.

कोणत्याही विवेकी आणि सुजाण व्यक्तीचे या ग्रंथाला समर्थन असू शकत नाही. स्वाभाविकच बाबासाहेबांचाही या ग्रंथाला विरोध होता. 'रिडल्स



इन हिंदुइझम' या ग्रंथात बाबासाहेबांनी 'मनूज मॅडनेस' असे एक प्रकरण लिहिले आहे. यात त्यांनी मनुस्मृतीची चिकित्सा केली आहे. बाराव्या खंडातही मनुस्मृती ही भूतकाळातील बाब नसून वर्तमानात मनुस्मृतीचे भूत कसे मानगुटीवर बसले आहे, हे त्यांनी स्पष्ट केले आहे.

बाबासाहेब ज्यांना आपले गुरू मानत त्या महात्मा फुले यांनी एकोणिसाव्या शतकातच म्हटले होते, 'जाळून टाकावा। मनुग्रंथ॥' (महात्मा फुले समग्र वाङ्मय, महाराष्ट्र शासन, १९९१, पृ.५५१) महात्मा फुले यांनी जे सांगितले ते बाबासाहेब आंबेडकरांनी कृतीत आणले. २५ डिसेंबर १९२७ रोजी महाडच्या परिषदेत त्यांनी मनुस्मृतीचे दहन केले.

बाबासाहेब आंबेडकर किती ग्रंथप्रेमी होते, याचे असंख्य पुरावे त्यांच्या चरित्रांमधून मिळतात. तरीही त्यांनी एक पुस्तक का जाळले असावे? वर उल्लेखल्याप्रमाणे मनुस्मृतीचा प्रतिवाद त्यांनी आधीच केलेला होता. मग पुस्तक जाळण्याची आवश्यकता होती का? आ. ह. साळुंखे यांचे 'मनुस्मृतीच्या समर्थकांची संस्कृती' हे पुस्तक वाचल्यावर मनुस्मृती दहनाची आवश्यकता अधिक तीव्रतेने पटते.

बौद्धिक युक्तिवाद करूनही बाबासाहेबांनी मनुस्मृती जाळली कारण ती विषमतेची विषवल्ली रुजवणारी होती कि ती माणसाला माणूसच मानत नव्हती. अश वेळी स्वच्छ, स्पष्ट, ठोस आणि प्रतीकात्मक संदेश देण्याकरता बाबासाहेबांनी ह कृती केली. त्यांनी केवळ मनुस्मृती नाकारली नाह तर काय स्वीकारायचे हेदेखील सांगितले.

मनुस्मृती हे विघातक संविधान जाळले आणि निळ्या आभाळाला गवसणी घालणारे विधायक संविधान स्वीकारले. अशी दुहेरी आणि मौलिक भूमिका निभावण्याची ऐतिहासिक कामगि बाबासाहेबांनी पार पाडली. मनुस्मृती जाळतान बापूसाहेब सहस्त्रबुद्धे बाबासाहेबांसोबत होते त संविधान निर्मितीत बाबासाहेब नेहरूंसोबत होते हा काव्यात्म न्याय घडतो तेव्हाच शंत कांबळेसारख्या कवींना जातीपातीच्या बेड झुगारून देत 'समतेचे पैंजण खणकावत येणाऱ्य पहाटेचे वेध लागतात.

- डॉ. श्रीरंजन आव
poetshriranjan@gmail.co

Scanned with OKEN Scanner

# वसाहतवादाचा संदर्भ


**ब्रिटिशांचा कायद्याच्या राज्यावर ठाम विश्वास होता, त्यामुळेच पुढे भारतात वाटाघाटी, सामंजस्य करार, गोलमेज परिषदा होऊ लागल्या...**

**संविधानाच्या निर्मिती** प्रक्रियेत प्राचीन आणि प्रागतिक परंपरांचा संदर्भ होता; मात्र अखेरीस भारताचं संविधान आकाराला आलं ते वसाहतवादाच्या चौकटीत. भारत हे आधुनिक अर्थानं राष्ट्र-राज्य (नेशन स्टेट) म्हणून उदयास आलं ते ब्रिटिश वसाहतवादाच्या काळात. त्यापूर्वी भारतीय उपखंड विविध साम्राज्यांमध्ये विभागला गेला होता. बहुतांश ठिकाणी राजेशाही होती. अगदी आपल्याला स्वातंत्र्य मिळाल्यानंतरही ५५० हून अधिक संस्थानं अस्तित्वात होती यावरून ब्रिटिशांच्या आगमनापूर्वीही किती साम्राज्यं असतील, याचा सहज अंदाज करता येऊ शकतो.

ईस्ट इंडिया कंपनी १६०० साली स्थापन झाली. तेव्हापासून ते भारताच्या स्वातंत्र्यापर्यंतच्या साडेतीनशे वर्षात ब्रिटिशांनी टप्प्याटप्प्यांनी आपले वर्चस्व प्रस्थापित केलं. हा काळ भांडवलवादाच्या तीन टप्प्यांमध्ये अभ्यासता येतो. (१) व्यापारी भांडवलवाद. (२) औद्योगिक भांडवलवाद. (३) वित्तीय भांडवलवाद. भांडवलवादाच्या पहिल्या टप्प्यात ब्रिटिशांनी व्यापारी संबंध प्रस्थापित करत पाय रोवले. दुसऱ्या टप्प्यात भारतीय वसाहतीमधील कच्चा माल वापरून पक्का माल इथे विकत भारताच्या अर्थव्यवस्थेची क्षमता शोषून घेतली. तिसऱ्या टप्प्यात ब्रिटिशांनी रेल्वेपासून ते टपाल, दूरसंचार यंत्रणा प्रस्थापित करत पूर्ण बस्तान बसवले.

या तीनही टप्प्यांमध्ये भारतीय वसाहतीने ब्रिटिशांच्या या भांडवलवादी कृतींना वेगवेगळा

### संविधानभान



**टपाल ते ट्रेन या वित्तीय भांडवलवादामुळे देशात व्यापक राजकीय भान निर्माण झाले.**

प्रतिसाद दिला. पहिल्या टप्प्यात विभागले गेलेल्या भारतीय वसाहतींमधल्या लोकांना ब्रिटिशांच्या कृतींचा अन्वयार्थच लागला नाही. दुसऱ्या टप्प्यात भारतीय वसाहतीला थेट आर्थिक फटका बसू लागला. याच काळात दादाभाई नौरोजींसारख्या मंडळींनी आर्थिक निःसारणाचा सिद्धांत (इकॉनॉमिक ड्रेन थिअरी) मांडत राजकीय भान जागृत करण्याचा प्रयत्न केला. साधारण एकोणिसाव्या शतकाच्या पूर्वार्धात औद्योगिक भांडवलवादाच्या टप्प्यात ब्रिटिशप्रणीत संस्कृतीशी संपर्क झाल्याने भारतीय कर्मठ परंपरेशी युरोपीय कल्पनांचा टकराव सुरू झाला. लॉर्ड मेकॉलेने सुरू केलेल्या पाश्चात्त्य शिक्षणाच्या प्रसाराने हा संघर्ष अधिक प्रमाणात पृष्ठभागावर आला. राजा राममोहन रॉय ते लोकहितवादी ते बेहरामजी मलबारी अशी सामाजिक सुधारकांची मोठी मांदियाळी दिसते.

एकोणिसाव्या शतकाच्या उत्तरार्धात केवळ सामाजिक अभिसरणासह राजकीय अभिसरणही मोठ्या प्रमाणावर झाले. त्या सगळ्याचे पर्यवसान १८८५ साली स्थापन झालेल्या राष्ट्रीय सभेमध्ये (काँग्रेस) दिसते. एकोणिसाव्या शतकातल्या मंथनाने समता आणि स्वातंत्र्याबाबतचा विमर्श निर्माण झाला. त्याला बंधुतेची जोड मिळू नये म्हणून ब्रिटिशांनी हरप्रकारे प्रयत्न केले मात्र तिसऱ्या टप्प्यात सुरू झालेला वित्तीय भांडवलवादातील टपाल ते ट्रेन या सगळ्याचा लाभ घेत देशभर एक व्यापक राजकीय भान निर्माण होऊ शकले.

एक बाब सर्वांत महत्त्वाची होती ती म्हणजे ब्रिटिशांचा कायद्याच्या राज्यावरील (रूल ऑफ लॉ) विश्वास. त्यासाठी ते विहित प्रक्रिया (ड्यू प्रोसेस) पार पाडण्यावर भर देत. ब्रिटिश साम्राज्यवादाचे हे वेगळेपण दुसऱ्या महायुद्धातल्या अन्य राष्ट्रांमधल्या साम्राज्यवादी महत्त्वाकांक्षांच्या पार्श्वभूमीवर सहज ध्यानात येते. त्यामुळेच वाटाघाटी, तडजोडी, सामंजस्य करार, गोलमेज परिषदा या सगळ्या बाबी घडू शकल्या. अर्थातच या संपूर्ण प्रक्रियेत काँग्रेसने सर्वांत महत्त्वाची भूमिका बजावली. वेळोवेळी काँग्रेसच्या अधिवेशनांत झालेले ठराव आणि ब्रिटिशांशी वाटाघाटी यातून नव्या संविधानासाठीची वाट प्रशस्त झाली.

**– डॉ. श्रीरंजन आवटे**
poetshriranjan@gmail.com

Scanned with OKEN Scanner

11/1/24

# मूलभूत हक्कांची पूर्वपीठिका : नेहरू अहवाल

**भारतीयांना संविधान लिहिता येणार नाही, याची ब्रिटिशांना खात्री होती, मात्र नेहरू अहवालाने ती खोटी ठरवत संविधानासाठी मशागत केली…**


संविधानभान

**एकोणिसाव्या शतकाच्या** उत्तरार्धात भारताचा स्वातंत्र्यासाठीचा झगडा अधिक तीव्र झाला. काँग्रेसची वार्षिक अधिवेशने होऊ लागली. त्यातून नवनव्या मागण्या समोर येऊ लागल्या. ब्रिटिश शासनाशी एक लढाई ही कायदेशीर प्रतलावरही सुरू होती. भारतीय वसाहतीतील लोकांमध्ये फूट पाडण्याचे ब्रिटिशांचे प्रयत्न १९०९ आणि १९१९ सालच्या कायद्यांनी स्पष्टपणे समोर आले.

पुढे ब्रिटिशांनी १९१९ च्या भारत सरकार कायद्याचे पुनरावलोकन करण्यासाठी १९२७ ला सायमन आयोग नेमला. कायदा भारतासाठी, मात्र त्यात एकही भारतीय व्यक्ती नव्हती, त्यामुळे राष्ट्रीय चळवळीने सायमन आयोगावर टीका केली. त्याआधीच १९२५ साली लॉर्ड बर्कनहेड यांनी संसदेत वक्तव्य केले होते, की भारतीयांनी स्वतः संविधान तयार करावे, जे सर्वांना मान्य असेल.

ब्रिटिश साहेबांच्या या विधानात दोन गृहीतके होती. एक तर भारतीय आधुनिक कायद्याच्या परिभाषेत संविधान लिहू शकणार नाहीत आणि दुसरे म्हणजे जे काही लिहितील त्यावर सर्वांची सहमती होणार नाही.

राष्ट्रीय चळवळीतील लोकांनी सायमन आयोगावर केवळ बहिष्कारच टाकला नाही, तर त्यांनी संविधाननिर्मितीचे आव्हान स्वीकारले. यात सर्वांच्या सहमतीचे आव्हान लक्षात घेऊन 'ऑल इंडिया लिबरल फेडरेशन', 'ऑल इंडिया मुस्लीम लीग', 'शीख सेंट्रल लीग' आणि इतर संघटनांसोबत १९ मे १९२८ रोजी संविधानाचा मसुदा तयार करण्यासाठी मोतीलाल नेहरू यांच्या अध्यक्षतेखाली समिती गठित करण्यात आली. या समितीमध्ये मोतीलाल नेहरू, सर अली इमाम, तेज बहादूर सप्रू आणि सुभाषचंद्र बोस यांसारखे सदस्य होते. पुढे ॲनी बेझंट आणि एम. आर. जयकर समितीमध्ये सामील झाले. पं. जवाहरलाल नेहरू या समितीचे सचिव होते.



१९२८ मध्ये संविधानाचा मसुदा तयार करण्यासाठी मोतीलाल नेहरू यांच्या अध्यक्षतेखाली समिती गठित करण्यात आली.

या समितीला जमातवादाचा प्रश्न आणि भारताला ब्रिटिश साम्राज्याअंतर्गत वैधानिक दर्जा मिळण्याचा प्रश्न या दोहोंबाबत मांडणी करण्यास सांगितले गेले होते. समितीने जो अहवाल सादर केला ते छोटेखानी संविधानच होते. २२ प्रकरणांमध्ये विभागलेल्या या अहवालामध्ये ८७ कलमे होती. सर्व बाबींचा समावेश या अहवालात होता. मुस्लिमांना स्वतंत्र मतदारसंघ देण्याऐवजी ज्या मतदारसंघात मुस्लीम अल्पसंख्य आहेत, तिथे त्यांना आरक्षण देण्यात आले. संसदीय लोकशाहीचे प्रारूप या अहवालातून स्वीकारले गेले. तसेच सर्वांना मतदानाचा हक्क असेल, अशी तरतूदही केली गेली.

नेहरू अहवालाला संमिश्र प्रतिसाद लाभला. 'द हिंदुस्तान टाइम्स'च्या संपादकीयात म्हटले होते, ''एक नवे राजकीय भान या अहवालाने निर्माण केले आहे. लॉर्ड बर्कनहेडचे आव्हान स्वीकारून आम्ही काम पूर्ण केले. आम्ही आमच्या स्वातंत्र्याची 'मॅग्ना कार्टा' तयार केली आहे.'' दुर्दैवाने पुढे मुस्लीम लीगने या अहवालात मुस्लिमांना स्वतंत्र मतदारसंघ दिले नाहीत, या मुद्द्यावरून पाठिंबा काढून घेतला.

नेहरू अहवाल हा काही अंशी अपयशी ठरला असला, तरी मूलभूत हक्कांपासून ते मार्गदर्शक तत्त्वांबाबत स्पष्टता येण्यासाठी या अहवालाची मोठ्या प्रमाणावर मदत झाली. या अहवालाने मूलभूत हक्कांची पूर्वपीठिका निर्माण केली असे ग्रॅनवील ऑस्टिन म्हणाले, तर नीरा चंदोक यांनी या अहवालातून सामाजिक आणि सांस्कृतिक हक्क देण्याचा प्रयत्न विशेष कौतुकास्पद असल्याचे नोंदवले. थोडक्यात, नेहरू अहवालाने स्वतंत्र भारताच्या संविधानासाठीची मशागत करून ठेवली.

**- डॉ. श्रीरंजन आवटे**

Scanned with OKEN Scanner

13/11/24


# संपूर्ण स्वातंत्र्याच्या दिशेने...

**संपूर्ण स्वराज्याची मागणी करताना व्यक्तीला नव्हे, तर प्रवृत्तीला विरोध करण्याचा पं. नेहरूंचा विचार गांधीजींच्या दृष्टिकोनाशी सुसंगत होता...**

**संविधानभान**

**नेहरू अहवालात** ब्रिटिश साम्राज्याअंतर्गत स्वतंत्र वसाहत (डॉमिनियन स्टेटस्) असा दर्जा मिळावा, ही मागणी होती. तोपर्यंत अनेकदा स्वतंत्र वसाहतीचा दर्जा अशीच मागणी केली गेली होती. लॉर्ड आयर्विन यांनी असा दर्जा देण्याचे सुरुवातीला कबूल केले, तसे घोषितही केले; मात्र इंग्लंडमध्ये भारताला स्वतंत्र वसाहतीचा दर्जा देण्याबाबतचा रोष पाहून त्यांनी भूमिका बदलली. भारताला नजीकच्या भविष्यात असा स्वतंत्र वसाहतीचा दर्जा देता येणार नाही, असे आयर्विन म्हणाले. जवाहरलाल नेहरू ब्रिटिशांच्या या वर्तनाने कमालीचे अस्वस्थ झाले. मुळातच स्वतंत्र वसाहतीऐवजी संपूर्ण स्वातंत्र्याची मागणी केली पाहिजे, याबाबत नेहरू कमालीचे आग्रही होते.

१९ डिसेंबर १९२९ च्या लाहोर अधिवेशनात जवाहरलाल नेहरू यांच्या अध्यक्षतेखाली पूर्ण स्वराज्याचा ठराव मांडला गेला. हा ठराव राजकीय जाहीरनाम्याच्या परिभाषेत होता. आर्थिक, राजकीय, सांस्कृतिक आणि आध्यात्मिकदृष्ट्या ब्रिटिशांनी भारतीयांचे अतोनात शोषण केले आहे. आता ब्रिटिशांना सहकार्य करत राहणे म्हणजे मानवतेविरुद्धचा गुन्हा आहे. त्यामुळे इथून पुढे आपण ब्रिटिशांना स्वेच्छेने सहकार्य करणार नाही. हे सारे युक्तिवाद करून अखेरीस या अहवालात म्हटले होते: आम्हाला पूर्ण स्वराज्य हवे आहे मात्र ते अहिंसेच्या मार्गाने. स्वातंत्र्य प्राप्त करण्याचा सर्वात



१९ डिसेंबर १९२९ रोजी झालेल लाहोर अधिवेशन

महात्मा गांधींनी अनेकदा साधनशुचितेचे महत्त्व अधोरेखित केले होतेच. केवळ उद्दिष्ट उदात्त आणि पवित्र असणे जरुरीचे नाही तर ते उद्दिष्ट प्राप्त करतानाचा मार्गही पवित्र असणे आवश्यक आहे. हा दृष्टिकोन स्वातंत्र्य मिळवताना उपयोगी ठरलाच, मात्र संविधाननिर्मिती आणि देशाची पुढील दिशा ठरवतानाही निर्धारक ठरला. अहिंसेच्या मार्गाने स्वातंत्र्यप्राप्ती हे भारतीय स्वातंत्र्य लढ्याचे व्यवच्छेदक वैशिष्ट्य आहे.

पूर्ण स्वराज्याच्या ठरावात भारतीयांनी २६ जानेवारी १९३० हा दिवस स्वातंत्र्य दिन म्हणून साजरा करावा, असे आवाहनही केले होते. पुढे याच

दिवस म्हणून १९५० साली घोषित झाला.

इतिहासकार प्रा. मिठी मुखर्जी यांनी म्हटले आहे, की पूर्ण स्वराज्याचा ठराव ही स्वातंत्र्य चळवळीतील निर्णायक घटना आहे, कारण येथून पुढे स्वातंत्र्याची मागणी दान (चॅरिटी) असल्याप्रमाणे नव्हे तर न्याय्य हक्क असल्याप्रमाणे केली गेली. काँग्रेसने पूर्ण स्वराज्याच्या ठरावाद्वारे ब्रिटिशांशी लढताना धोरणात्मक आणि डावपेचात्मक बदल केला. त्यासाठी प्रयत्नांची शर्थ केली.

पं. नेहरू या प्रसंगी म्हणाले होते की संपूर्ण स्वातंत्र्य हेच आता आपले ध्येय आहे. कदाचित युद्धही करावे लागू शकते, मात्र याचा अर्थ ब्रिटिश आपले कायमस्वरूपी शत्रू नाहीत. साम्राज्यवाद हा आपला शत्रू आहे. व्यक्तीला, समूहाला विरोध करण्याऐवजी प्रवृत्तीला विरोध करण्याचा दृष्टिकोन हा हृदयपरिवर्तनावर विश्वास असलेल्या गांधीजींच्या दृष्टिकोनाशी सुसंगत होता. त्यामुळेच २६ जानेवारी १९३० ला जेव्हा स्वातंत्र्य दिन साजरा करताना भारताचा तिरंगा फडकला तेव्हा या तिरंग्याच्या मधोमध असलेल्या सुताच्या चरख्यातून कातल्या जाणाऱ्या धाग्यांमधून भारतीय स्वातंत्र्याचे आणि एकतेचे वस्त्र विणले जात होते. केवळ संपूर्ण स्वराज्यच नव्हे तर सुराज्याच्या दिशेने जाण्याचा मार्ग त्यातूनच अधिक प्रशस्त झाला.

– डॉ. श्रीरंजन आवटे
poetshriranjan@gmail.com

Scanned with OKEN Scanner

7/11/24

# पर्यायी जगाचे संकल्पचित्र

**संविधान मसुद्यातून पर्यायी जगाचे संकल्पचित्र मांडण्याचा कम्युनिस्ट नेते एम. एन. रॉय यांचा प्रयत्न विशेष दखलपात्र ठरतो...**

संविधानभान



एम. एन. रॉय

**नेहरू अहवाल,** कराची ठराव, भारत सरकार कायदा (१९३५) असे सारे प्रयत्न होत असले तरी स्वतंत्र देशाचे संविधान कसे असेल याविषयी सहमती होत नव्हती. त्यामुळे कम्युनिस्ट चळवळीतील महत्त्वाचे नेते, विचारवंत एम. एन. रॉय अस्वस्थ होते. अशी अवस्था येण्यास सारे राजकीय पक्ष कारणीभूत आहेत, अशी त्यांची भूमिका होती. गंमत म्हणजे त्यांनी स्वतः रॅडिकल डेमॉक्रॅटिक पार्टीची स्थापना केली होती.

१९४४ साली त्यांनी स्वतःच 'स्वतंत्र भारताचे संविधान : मसुदा' या शीर्षकासह एक दस्तावेज प्रकाशित केला. त्यांच्या मते, या मसुद्यातून तीन बाबी होणे अपेक्षित होते : १. ब्रिटिशांकडून भारताकडे सत्तेचे हस्तांतर होत असताना राजकीय पक्षांची मध्यस्थी असता कामा नये. २. स्वतंत्र भारताच्या संविधानाचे संकल्पचित्र यातून साकारले जाईल. ३. सत्तांतराच्या प्रक्रियेला वेग येईल.

ब्रिटिशांकडून होणारे सत्तांतर ही केवळ औपचारिकता आहे, असा त्यांचा समज होता. भारताकडे सत्ता सोपवत असताना नेमकी ती कोणाकडे सोपवली जाणार, हा प्रश्न होताच. लोकांकडेच ही सत्ता असली पाहिजे, यासाठी लोकांचे सार्वभौमत्व अधोरेखित करणारे संविधान लिहिण्याचा प्रयत्न रॉय यांनी केला. त्यामुळेच त्यांनी सत्तेचे विकेंद्रीकरण करत प्रत्यक्ष लोकशाही आणण्याकरिता प्रयत्न केले. देशभर लोकांच्या समित्या स्थापन करून सर्व लोकांना निर्णय प्रक्रियेत सहभागी करून घेण्याचे प्रारूप त्यांनी मांडले.

रॉय यांनी प्रस्तावित केलेल्या या संविधानात १३ प्रकरणे आहेत. यात प्रामुख्याने कामगारांसाठी तरतुदी आहेत. कामगारांना केंद्रबिंदू मानून रॉय यांनी हा मसुदा तयार केला होता. कामगारांना राजकीय दर्जा मिळावा, त्यांच्या नागरिकत्वाशी जोडलेले सर्व मूलभूत हक्क असले पाहिजेत, असे त्यांचे आग्रही प्रतिपादन होते. कोणत्याही कामगाराला दिवसातील आठ तासांहून अधिक श्रम करायला लागू नयेत. त्यांना अडचणीच्या वेळी पगारी रजा मिळावी, असे मुद्दे यात मांडण्यात आले होते. या मसुद्याने कामगारांना केंद्रस्थानी आणले.

जमिनीचे राष्ट्रीयीकरण केले जावे, हा एक अतिशय मूलगामी मुद्दा या संविधानात मांडण्यात आला होता. जमिनीची असमान मालकी हे भारतातील आर्थिक विषमतेचे प्रमुख कारण आहे आणि त्यामुळे जमिनीचे राष्ट्रीयीकरण करणे हे त्याचे उत्तर असू शकते, अशी रॉय यांची धारणा होती. रशियातील जमिनीच्या राष्ट्रीयीकरणाचा प्रयोग रॉय यांच्या डोळ्यासमोर होता.

याशिवाय निवडणुकीत प्रमाणबद्ध प्रतिनिधित्व असले पाहिजे जेणेकरून लोकांचे योग्य प्रतिनिधित्व होऊ शकेल, असे त्यांचे मत होते. अल्पसंख्याकांसाठी विभक्त मतदारसंघांची तरतूद या मसुद्यातही होती. थोडक्यात, समतेचे मूल्य अधोरेखित करणारा आणि स्वतंत्र भारताला विकासाची दिशा सांगणारा असा हा मसुदा होता. तत्त्वज्ञ असलेल्या रॉय यांचा नव्या मानवतावादाची पायाभरणी करण्याचा हा प्रयत्न होता.

रॉय यांचा हा मसुदा हा स्वप्नाळू होता आणि बऱ्याच प्रमाणात अव्यवहार्य होता, मात्र त्यांनी तयार केलेल्या या मसुद्यामुळे स्वतंत्र भारताच्या संविधानात समाजवादी तत्त्वांचा अंतर्भाव होण्यास मदत झाली, असे ग्रॅनवील ऑस्टिन यांनी म्हटले आहे. मुळात स्वतंत्र भारताच्या नव्या संविधानासाठी संविधानसभा असली पाहिजे, ही कल्पनाच सर्वप्रथम रॉय यांनी मांडली. प्रत्येक वेळी स्वप्ने प्रत्यक्षात येतातच असे नव्हे; पण स्वप्नांचे संकल्पचित्र रेखाटत राहिले पाहिजे, असे या मसुद्यातून लक्षात येते. कारण तेव्हाच स्वप्नलोकाच्या (युटोपिया) बांधकामाची सुरुवात होऊ शकते. म्हणूनच रॉय यांनी पर्यायी जगाचे संकल्पचित्र मांडण्याचा केलेला प्रयत्न विशेष दखलपात्र ठरतो.

**- डॉ. श्रीरंजन आवटे**
poetshriranjan@gmail.com


Scanned with OKEN Scanner

# स्वराज्याचा आराखडा : कराची ठराव

15/11/24

**संविधानभान**

**नेहरू अहवालाने** पूर्ण स्वातंत्र्याच्या दिशेने ठोस पाऊल टाकले. पुढे १९३१ साली झालेल्या कराची अधिवेशनातून या वाटचालीची दिशा निश्चित झाली. कराची अधिवेशनाच्या केवळ चार दिवस आधी भगतसिंग, राजगुरू, सुखदेव यांना फाशी देण्यात आली होती. देशभर असंतोष निर्माण झाला होता. दांडी यात्रेमुळे गांधीजी तुरुंगात होते. त्यांची या अधिवेशनाच्या आधी सुटका झाली आणि गांधी-आयर्विन करार होऊन सविनय कायदेभंग चळवळ संपली होती. गांधींनी शर्थीचे प्रयत्न करूनही तीनही क्रांतिकारकांना वाचवता आले नव्हते. फाशीच्या शिक्षेने अनेक ठिकाणी दंगे सुरू झाले. काँग्रेसचे कार्यकर्ते गणेश शंकर विद्यार्थी यांनी ही दंगल शमवण्याचा प्रयत्न केला. त्यांनी शेकडोंचे जीव वाचवले. मात्र त्यांना स्वतःचा जीव गमवावा लागला. त्या पार्श्वभूमीवर गांधी म्हणाले, ''गणेश शंकर विद्यार्थी यांचे रक्तच दोन धर्मांना एकत्र आणू शकेल.'' गांधी बोलल्यानंतर वातावरण काहीसे शांत झाले. अशा सगळ्या कल्लोळाच्या पार्श्वभूमीवर कराची अधिवेशन भरले होते. सरदार वल्लभभाई पटेल या अधिवेशनाचे अध्यक्ष होते.



या अधिवेशनाच्या सुरुवातीला भगतसिंग, राजगुरू आणि सुखदेव यांच्या हिंसक, क्रांतिकारी मार्गाशी फारकत घेतानाच त्यांच्या हौतात्म्याचा गौरव केला गेला. आपल्याला स्वातंत्र्य मिळाल्यावर आपले स्वराज्य सरकार (भारतीयांचे सरकार) कसे असेल, याचा आराखडा मांडण्यासाठी ठराव केला गेला. काँग्रेसच्या मते स्वराज्य कसे असेल हे सर्वसामान्य लोकांना सांगण्याचा हा प्रयत्न होता.

कायद्याच्या परिभाषेत लिहिलेल्या या ठरावात चार भाग होते :

(१) मूलभूत हक्क आणि तत्त्वे
(२) श्रम
(३) कर आणि खर्च
(४) आर्थिक आणि सामाजिक कार्यक्रम.

'प्रत्येकाला आपल्या श्रद्धांनुसार वागण्याचे स्वातंत्र्य आहे' आणि 'राज्यसंस्थेने धर्माबाबत तटस्थ असले पाहिजे' ही तत्त्वे तसेच अभिव्यक्तिस्वातंत्र्याच्या हक्कापासून ते सार्वत्रिक प्रौढ मताधिकारापर्यंत अशा अनेक मूलभूत बाबी या पहिल्या भागात होत्या. श्रमविषयक असलेल्या दुसऱ्या भागात वेठबिगारी प्रथा पूर्णपणे संपुष्टात आणून कामगारांना सन्मानाने जगण्याइतपत वेतन मिळाले पाहिजे, त्यांचे कामाचे तास मर्यादित असले पाहिजेत, आरोग्यदायी वातावरणात काम करता आले पाहिजे, स्त्रियांना गरोदरपणात रजा मिळाली पाहिजे अशा तरतुदी होत्या.

तिसऱ्या भागात मिठावरचा कर रद्द करण्यापासून ते शेतसारा कमी करण्यापर्यंत अनेक बाबी होत्या. अगदी शासकीय अधिकाऱ्यांचा पगार ५०० रुपयांहून अधिक असता कामा नये, अशी तरतूदही होती. लष्करावरील खर्चात कपात करण्यात यावी, असेही म्हटले होते. शेवटच्या भागात स्वदेशी कपडे, स्वदेशी उद्योग यांना परकीय स्पर्धेपासून संरक्षण मिळावे याकरता तरतुदी केल्या गेल्या. महत्त्वाचे उद्योग, खाणकाम, दळणवळण या सगळ्याचे नियंत्रण राज्यसंस्थेकडे असेल जेणेकरून राष्ट्रीय हितास प्राधान्य देता येईल. शेतकऱ्यांना कर्जबाजारीपणातून मुक्त करण्यासाठीचे नियोजनही यात मांडले होते.

या ठरावाचा मसुदा लिहिला होता पं. नेहरूंनी. त्याचे संपादन केले होते महात्मा गांधींनी. या ठरावाने देशाला सामाजिक आणि आर्थिक कार्यक्रमाची नेमकी कल्पना दिली. या ठरावामुळे पहिल्यांदाच मार्गदर्शक तत्त्वांचा मुद्दा पटलावर आला. स्वतंत्र भारताच्या संविधानातील चौथ्या भागात या मार्गदर्शक तत्त्वांची मांडणी करताना कराची ठराव महत्त्वाचा ठरला. 'समाजवादी' हा शब्द नंतर संविधानाच्या उद्देशिकेत जोडला गेला असला तरी समाजवादी तत्त्वांची मुळे आपल्याला अशा ठरावात दिसतात.

**– डॉ. श्रीरंजन आवटे**
poetshriranjan@gmail.com

Scanned with OKEN Scanner

16/1/24

# संघराज्यवादाची चौकट

**भारत सरकार कायद्यावर (१९३५) 'गुलामीचे संविधान' अशी टीका झाली असली, तरीही त्याने भारताला संघराज्याच्या प्रारूपाची दिशा दिली…**

**संविधानभान**

**कराची ठरावानंतरचा** महत्त्वाचा टप्पा म्हणजे १९३५ चा भारत सरकार कायदा. संवैधानिक सुधारणा व्हाव्यात म्हणून भारतीय राष्ट्रीय चळवळीच्या मागण्या जोरकसपणे केल्या जात होत्या. कराची ठरावानंतर गोलमेज परिषदा पार पडल्या. त्यात बरेच मंथन झाले. अखेरीस लॉर्ड लिनलिथगो यांच्या नेतृत्वातील संयुक्त निवड समितीने १९३५ चा भारत सरकार कायदा तयार केला. ब्रिटिश संसदेने तो संमत केला. ब्रिटिशांच्या प्रशासकीय इतिहासातला हा कायदा सर्वांत मोठा लिखित दस्तावेज आहे. हा कायदा ११ भागांत आणि १० परिशिष्टांमध्ये विभागलेला आहे. त्यात पुन्हा स्वतंत्र प्रकरणं आहेत. सुमारे दोन हजारहून अधिक संसदीय भाषणांच्या आधारे या कायद्याचा मसुदा तयार झाला.

या कायद्याने भारताला संघराज्याच्या प्रारूपाची (फेडरल मॉडेल) दिशा दिली. सत्तेचे अलगीकरण (सेपरेशन) हे सत्तेचे आडवे विभाजन आहे. ज्याद्वारे विधिमंडळ, कार्यकारी मंडळ, न्यायमंडळ असे विभाजन होते. संघराज्यवादामध्ये मात्र सत्तेचे उभे विभाजन अपेक्षित असते. याचा अर्थ केंद्र आणि घटक राज्य यांच्यामध्ये सत्तेचे विभाजन. या कायद्याने केंद्र पातळीवरील कायदेमंडळ आणि कार्यकारी मंडळ तयार करावे, असे म्हटले तर प्रांतिक मंडळे आणि संस्थाने ही दुसरी पातळी निर्धारित करण्यात आली. केंद्रीय पातळीवर विधिमंडळाची दोन सभागृहे असावीत, असे सुचवले गेले. सत्तेच्या या उभ्या विभाजनात केंद्राकडे अधिक अधिकार होते. संरक्षण, परराष्ट्र धोरण यांसारखे प्रमुख विषय गव्हर्नर जनरलच्या अखत्यारीत होते. याच कायद्यान्वये फेडरल कोर्टाची स्थापना झाली. रिझर्व्ह बँकेची स्थापनाही याच कायद्याअंतर्गत झाली. केंद्रीय (फेडरल) लोकसेवा आयोगाचीही स्थापना करण्यात आली. या आधीच्या इतर कायद्यांप्रमाणेच मुस्लीम आणि शिखांना स्वतंत्र मतदारसंघांची तरतूद करून ब्रिटिशांचा फूट पाडण्याचा डाव स्वच्छ दिसत होताच.



गोलमेज परिषदांत बरेच मंथन झाल्यानंतर भारत सरकार कायदा संमत झाला.

मात्र तुलनेने एक बरी म्हणावी अशी बाब म्हणजे, निवडणूक प्रक्रियेत पात्र मतदारांची संख्या वाढली. थेट निवडणुकीचे क्षेत्र वाढल्यामुळे पूर्वी साधारण ५० लाखांच्या आसपास मतदार निवडणूक प्रक्रियेत सहभागी होते. ती संख्या साधारण साडेतीन कोटींपर्यंत (तेव्हाच्या लोकसंख्येच्या साधारण १२ टक्के) पोहोचली. त्याचा परिणाम १९३७ सालच्या निवडणुकांमध्ये दिसला. त्यातून काँग्रेस हा जनतेने मान्य केलेला पक्ष म्हणून प्रस्थापित होऊ लागला.

अ‍ॅन्ड्रू मल्डूनसारख्या संशोधकाने 'एम्पायर, पॉलिटिक्स अ‍ॅण्ड द क्रिएशन ऑफ १९३५ अ‍ॅक्ट' या पुस्तकात म्हटले आहे की, हा कायदा ब्रिटिश प्रशासकीय इतिहासातला निर्णायक टप्पा होता आणि ब्रिटिशांनी भारतावरची पकड अधिक मजबूत करण्याकरता हा कायदा केला होता. काँग्रेसने निर्माण केलेले आव्हान शिथिल करत आपले वर्चस्व वेगळ्या मार्गाने प्रस्थापित करण्याची ही कायदेशीर चलाखी होती. काँग्रेसमधल्या नेत्यांनी ही चलाखी ओळखली होती त्यामुळेच हा कायदा म्हणजे 'भारताचे आर्थिक शोषण करणारे गुलामीचे संविधान आहे', अशा शब्दात काँग्रेसने टीका केली होती.

या कायद्यावर अनेकांनी टीका केलेली असली तरीही संघराज्याचा पाया अधिक बळकट होण्याकरता या कायद्याची मदत झाली. संघराज्यवाद हा भारतासारख्या विशाल लोकसंख्येच्या देशासाठी सोयीचा होताच शिवाय संघराज्यवादातून विविधतेचे समायोजन करण्याची एक पद्धत विकसित होते. स्वतंत्र भारताच्या संविधानात संघराज्यवादविषयक तरतुदी आकाराला येण्यामध्ये या कायद्याचा निर्णायक वाटा आहे. त्यातून विविधतेशी जुळणारी, प्रादेशिक अस्मितांशी सुसंगत अशी संघराज्यवादाची संवैधानिक चौकट निर्माण होऊ शकली.

**– डॉ. श्रीरंजन आवटे**
poetshriranjan@gmail.com

Scanned with OKEN Scanner

# गांधीवादी संविधान...

**श्रीमन अग्रवाल यांनी लिहिलेल्या गांधीवादी संविधानाला मर्यादा असल्या, तरी त्याने पंचायत राज व्यवस्थेतून 'अंत्योदयी' रस्ता दाखविला...**


**स्वातंत्र्य नजरेच्या** टापूत दिसू लागल्यापासून भारताच्या वाटचालीकरिता वेगवेगळ्या कल्पना समोर येऊ लागल्या. संविधानाची नवी प्रारूपं मांडली जाऊ लागली. एम. एन. रॉय यांनी जसे स्वतंत्र भारतासाठी संविधान लिहिले तसेच श्रीमन नारायण अग्रवाल यांनीही स्वतंत्र भारताकरता एक गांधीवादी संविधान लिहिले. १९४६ साली ते प्रकाशित झाले.

श्रीमन नारायण अग्रवाल हे महात्मा गांधींचे अनुयायी होते. अर्थतज्ज्ञ होते. पहिल्या लोकसभेचे ते खासदार झाले. नागपूर विद्यापीठात अधिष्ठाता (डीन), गुजरातचे राज्यपाल अशा विविध पदांवर त्यांनी काम केले.

त्यांनी लिहिलेले संविधान साधारण ६० पानांचे २२ प्रकरणांत विभागलेले आहे. यातला काही भाग वर्णनात्मक, स्पष्टीकरणात्मक भाषेत आहे, तर काही भाग कायद्याच्या परिभाषेत. गांधींनी स्वतः या संविधानात काहीही लिहिले नसले, तरी या मसुद्याला गांधींची प्रस्तावना आहे. या प्रस्तावनेत अग्रवाल यांच्या मांडणीला गांधींनी दुजोरा दिला आहे.

अग्रवालांनी या गांधीवादी संविधानात मूलभूत हक्कांची मांडणी केली आहे. अभिव्यक्ती स्वातंत्र्यापासून ते सर्वांना मतदानाचा हक्क देण्यापर्यंत अनेक बाबींचा समावेश यात केलेला आहे. आश्चर्याची गोष्ट म्हणजे अगदी स्वसंरक्षणाकरता शस्त्र बाळगण्याचा हक्कही असला पाहिजे, असे या संविधानात लिहिले होते. शिक्षण हा अग्रवालांच्या आस्थेचा मुद्दा होता. त्यांनी गांधीजींच्या 'नई तालीम' या संकल्पनेशी सुसंगत असे पायाभूत शिक्षण घेण्याचा हक्क प्रत्येकाला असला पाहिजे, असे

**संविधानभान**



श्रीमन नारायण अग्रवाल

आग्रही प्रतिपादन या संविधानात केले आहे.

या संविधानाचे केंद्र होते गाव. 'स्वयंपूर्ण खेडे' ही संकल्पना गांधींनी अनेकदा मांडली होती. त्या आधारे अग्रवाल यांनी मांडणी केली होती. या संविधानात पंचायत राज व्यवस्थेवर भर होता. गावापासून केंद्राकडे असे सत्तेचे ऊर्ध्वगामी प्रारूप मांडले होते. ही सगळी रचना शंकूच्या आकाराची (पिरॅमिडल) आहे. त्यामुळे गावापासून केंद्र पातळीपर्यंत जाण्याचा रस्ता हे संविधान दाखवते. गाव पातळीवर प्रत्यक्ष निवडणूक तर तालुका आणि जिल्हा पातळीवर अप्रत्यक्ष निवडणुकांच्या माध्यमातून प्रतिनिधी निवडीची प्रक्रिया व्हावी, असेही त्यांनी सुचवले होते.

अग्रवालांच्या मते, लोकशाही आणि हिंसा एकत्र असू शकत नाहीत. भांडवलवादी समाज हे तर शोषणाचे मूर्तिमंत रूप आहे. त्यामुळे भांडवलशाही आणि साम्यवाद या दोहोंना विरोध करत सत्तेच्या विकेंद्रीकरणातून अहिंसक लोकशाहीची प्रतिष्ठापना होऊ शकते, असे अतिशय मूलभूत विवेचन त्यांनी केले आहे.

मोठ्या अवजड उद्योगांऐवजी कुटिरोद्योगासारख्या लघु पातळीवरील उद्योगांवर लक्ष केंद्रित करून खेडे स्वयंपूर्ण केले पाहिजे, असा विचार मांडण्यात आला होता. खेडे हे एकक मानून आर्थिक विकासाची एक पर्यायी दिशा दाखवण्याचा हा प्रयत्न होता. पं. नेहरू या मांडणीशी सहमत नव्हते. आधुनिक औद्योगिक जगाची दिशा लक्षात घेता हे प्रारूप कितपत व्यवहार्य आहे, याविषयी ते साशंक होते. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनाही खेडे हे मुळातच जातीपातींचे डबके वाटत होते, त्यामुळे त्याला केंद्र मानून आर्थिक विकासाची दिशा निर्धारित करणे त्यांना नामंजूर होते. त्यामुळेच गांधीवादी तत्त्वांचा अंतर्भाव करण्याविषयी संविधान सभेत चर्चा सुरू झाली तेव्हा बाबासाहेबांनी गांधीवादी आर्थिक प्रारूपाला विरोध केला.

गांधीवादी संविधानाच्या मर्यादा लक्षात घेऊनही या संविधानाला विशेष महत्त्व आहे. या संविधानाने विकेंद्रीकरणाचे महत्त्व ध्यानात आणून दिले. पंचायत राज व्यवस्था लगेच लागू करता आली नसली तरी १९९३ पासून पंचायत राज व्यवस्थेतून झालेले बदल सर्वत्र अनुभवास येत आहेत. शेवटच्या माणसापर्यंत पोहोचण्यासाठीचा गांधीजींचा 'अंत्योदयी' रस्ता दाखवण्याचे काम या संविधानाने केले.

**– डॉ. श्रीरंजन आवटे**
poetshriranjan@gmail.com

Scanned with OKEN Scanner

19/1/24

संविधानभान

# धर्मापलीकडे जाणारे संविधान!

**वसाहतवादाच्या काळात** भारत राष्ट्र बनण्याची प्रक्रिया घडली तशीच भारतीय समूह अधिक विभाजित होण्याची प्रक्रियाही घडली. 'फोडा आणि राज्य करा' ही ब्रिटिशांची रणनीती होती. म्हणूनच तर १९०९ च्या कायद्यात ब्रिटिशांनी मुस्लिमांकरिता स्वतंत्र मतदारसंघाची तरतूद केली. १९१९ च्या भारत सरकार कायद्यातही ही तरतूद होतीच. त्या आधी बंगालची फाळणी करून ब्रिटिशांनी हिंदू-मुस्लीम तणाव निर्माण करण्याचे सक्रिय प्रयत्न केले तेव्हा हिंदू-मुस्लिमांनी एकतेचे उदाहरण दाखवून दिले. त्यामुळे १९११ साली फाळणी रद्द करावी लागली होती; मात्र तरीही हिंदू संस्कृती आणि मुस्लीम संस्कृती या पूर्णतः भिन्न आहेत आणि हे दोन्ही समूह एकत्र राहू शकत नाहीत, असे मानस तयार करण्यात ब्रिटिशांना यश आले. १९०६ सालीच मुस्लीम लीग स्थापन झाली होती. हळूहळू मुस्लीम जमातवादी संघटनाला वेग येऊ लागला होता.

१९२० च्या दशकात तर ब्रिटिशांच्या फुटीरतावादी युक्तींना यश येऊ लागले. नेहरू अहवालाने पूर्ण स्वराज्याची मागणी केली होती, मात्र मुस्लीम लीगने स्वतंत्र मतदारसंघ नसल्याने त्याला कडाडून विरोध केला. यावेळी मोहम्मद अली जिना यांनी १४ मुद्दे असलेले निवेदन सादर केले. या निवेदनात म्हटले होते, केंद्रीय कायदेमंडळात एक तृतीयांश मुस्लीम प्रतिनिधी असलेच पाहिजेत.

मुस्लिमांकरता स्वतंत्र मतदारसंघ हवेत. तसेच सर्वच धर्मसमूहांना स्वतंत्र मतदारसंघांची तरतूद असली पाहिजे. जर त्या समूहाला संयुक्त मतदारसंघ हवे असतील तर ते स्वतः निवड करू शकतील. पंजाब, बंगाल आणि वायव्य सरहद्द प्रांत यामध्ये बहुसंख्य मुस्लीम होते. त्यामुळे या प्रांतांमधील मुस्लीमबहुलतेला धक्का पोहोचेल, असे प्रांतांचे विभाजन करता कामा नये. याशिवाय सिंध प्रांत मुंबई प्रांतापासून अलग केला पाहिजे, अशा प्रकारच्या १४ मागण्या होत्या. काँग्रेसने भारतीय समाजात फूट पाडणाऱ्या या मागण्यांना कडाडून विरोध केला.

सुरुवातीला काँग्रेसमध्ये असलेल्या जिनांना मुस्लीम जमातवादी राजकारणात संधी दिसू लागली होती. त्यामुळे काँग्रेस सोडून मुस्लीम जमातवादाचे नेतृत्व त्यांनी स्वीकारले आणि काँग्रेस केवळ हिंदूंचे प्रतिनिधित्व करते, असा समज निर्माण केला जाऊ लागला. प्रत्यक्षात काँग्रेसमध्ये अनेक मुस्लीम होते आणि मुस्लीम लीगपेक्षाही मुस्लिमांचा काँग्रेसला अधिक पाठिंबा होता. मात्र ब्रिटिशांच्या पाठिंब्यामुळे जमातवादी शक्तींना यश आले. १९३० च्या दशकात 'पाकिस्तान' असे स्वतंत्र नावही रूढ झाले. १९४० पासून तर थेट स्वतंत्र पाकिस्तानची मागणी होऊ लागली.

गांधी, नेहरू, पटेल या सर्वांनी प्रयत्न करूनही अखेर मुस्लीम राष्ट्राच्या दिशेने प्रवास सुरू झाला. धर्माधारित संविधान काँग्रेसला नामंजूर होते. रफिक झकेरिया यांनी 'प्राइस ऑफ पार्टिशन' या पुस्तकात या काळातील वाटाघाटी आणि डावपेच यांचे विश्लेषण केले आहे. त्यातून मुस्लीम लीगचे आणि जिनांचे धर्मांध डावपेच लक्षात येतात.

भारताची संविधान सभा स्थापन होण्यापूर्वीच मुस्लीम जमातवादाचे मोठे आव्हान निर्माण झाले होते. धर्माच्या संकुचित पायावर संविधान आणि देश उभा राहणे घातक आहे, याची जाणीव स्वातंत्र्य आंदोलनातल्या अग्रणी नेत्यांना होती. कॅबिनेट मिशन योजनेला मुस्लीम लीगने विरोध केला. संविधाननिर्मिती प्रक्रियेतून काढता पाय घेत १६ ऑगस्ट १९४६ हा 'प्रत्यक्ष कृती दिवस' साजरा करण्याचे आवाहन करत थेट हिंसेला आमंत्रण दिले गेले. अखेरीस फाळणी झाली, मुस्लीम लीगचे सदस्यही संविधान सभेतून बाहेर पडले. नौआखालीमध्ये हिंदू-मुस्लीम दंगे शमवण्यासाठी ७७ वर्षांचे गांधीजी भर रस्त्यात उभे होते तेव्हा भारताचा धर्माच्या पलीकडे जाणारे परिवर्तनवादी संविधान आखण्यासाठीचा रस्ता प्रशस्त झाला होता.

- डॉ. श्रीरंजन आवटे
poetshriranjan@gmail.com

Scanned with OKEN Scanner

२/११/२४

# हिंदू राष्ट्राचा विचार

**देशासाठी विविध संकल्पचित्रे मांडली जात असताना कोणत्या दिशेने जायचे नाही, हे समजणेही जरुरीचे होते...**

## संविधानभान

**स्वातंत्र्य आंदोलन** १९३० च्या दशकात निर्णायक टप्प्यावर आले. नव्या संविधानाची चर्चाही पुढील टप्प्यावर पोहोचली. स्वातंत्र्य आंदोलन आणि संविधान निर्मिती प्रक्रिया ही एकत्रच घडत होती. १९२५ साली स्थापन झालेला राष्ट्रीय स्वयंसेवक संघ स्वातंत्र्य आंदोलनात कुठेही सहभागी नव्हता. उलटपक्षी, लोकांनी 'चले जाव' चळवळीत सामील होऊ नये, असे संघाचे म्हणणे होते (श्री गुरुजी समग्र दर्शन, खंड ४, पृ ४०).

स्वातंत्र्य आंदोलनात सहभाग नसला तरीही राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचा नव्या राष्ट्राविषयीचा विशिष्ट विचार होता. हा विचार संघाचे दुसरे सरसंघचालक माधव सदाशिव गोळवलकर यांनी लिहिलेल्या 'वी ऑर अवर नेशनहूड डिफाइन्ड' या १९३९ साली प्रकाशित झालेल्या पुस्तकातून दिसतो.

सात प्रकरणांमध्ये विभागलेल्या या पुस्तकातून संघाचा विचार समजून घ्यायला मदत होते. गोळवलकरांच्या स्वप्नातील राष्ट्र हे 'हिंदू राष्ट्र' होते. या हिंदू राष्ट्रासाठी त्यांना विशुद्ध आर्य वंश हा पाया आहे, असे वाटत होते. हिंदू धर्म आणि हिंदू संस्कृती ही इतरांहून कशी वेगळी आहे, हे सांगण्याचा त्यांनी प्रयत्न केला. संस्कृत भाषा ही सर्व भाषांची माता असून त्यातून नव्या देशाची उभारणी करणे जरुरीचे आहे, अशी आग्रही मांडणी त्यांनी केली.

पहिल्या महायुद्धापूर्वीच्या त्या काळात मुसोलिनीच्या नेतृत्वातील इटली आणि हिटलरच्या नेतृत्वातील जर्मनी हे गोळवलकारांचे आदर्श होते. गोळवलकरांच्या मते, हिंदुस्तान हिंदूंचे आहे आणि त्यामुळे इतर अल्पसंख्याकांना येथे राहायचे असल्यास त्यांनी हिंदूंचे वर्चस्व स्वीकारले पाहिजे. गोळवलकरांच्या साऱ्या मांडणीवर वि. दा. सावरकर यांचे 'हिंदुत्व' (१९२३) आणि बाबाराव सावरकरांचे 'राष्ट्रमीमांसा' (१९३४) या पुस्तकांचा प्रभाव आहे.



गोळवलकर या पुस्तकात चातुर्वर्ण्य व्यवस्थेचे समर्थन करतात. जातव्यवस्था ही सामाजिक नियमनाकरिता उपयुक्त असल्याची मांडणी करतात. थोडक्यात, चार प्रमुख मुद्द्यांवर गोळवलकरांचे राष्ट्र उभारले आहे : (१) हिंदूंचे राष्ट्र (२) अल्पसंख्याकांना दुय्यम स्थान (४) नाझी जर्मनीप्रमाणे एकचालकानुवर्ती राज्ययंत्रणा (४) उतरंड असलेला समाज.

प्रा. शमसुल इस्लाम यांनी गोळवलकर यांच्या जन्मशताब्दी वर्षात (२००६) या पुस्तकाचा अतिशय चिकित्सक प्रतिवाद केला आहे. गोळवलकरांची दृष्टी भारतीय संविधानाशी विसंगत आणि विघातक होती हे त्यांनी सुस्पष्ट दाखवले आहे.

बाबासाहेब आंबेडकरांनी या विचारांचा विरोध केला. समता हे मूल्य मानणाऱ्या बाबासाहेबांनी हिंदू धर्मातील विषमतेवर बोट ठेवले. हिंदू म्हणून जन्माला आलो, मात्र हिंदू म्हणून मरणार नाही, अशी ऐतिहासिक घोषणा बाबासाहेबांनी १९३६ साली केली; तर १९३९ साली प्रकाशित झालेल्या पुस्तकात गोळवलकरांनी हिंदू राष्ट्राचे स्वप्न मांडले. पं. नेहरू यांनीही जर्मनी आणि इटली येथील फॅसिस्ट हुकूमशाहीचा धिक्कार केला होता. नाझी जर्मनीमुळे मानवतेचे किती मोठे अधःपतन झाले आहे, हे त्यांनी स्पष्ट केले होते. त्यामुळेच पुढे संघाच्या परंपरेतील श्यामाप्रसाद मुखर्जी संविधान सभेत असले तरी गोळवलकरांना अपेक्षित असलेले संविधान भारताने नाकारले कारण ते विषमतेवर आधारित होते.

गांधीहत्येनंतर या पुस्तकावर इतकी टीका झाली की, गोळवलकरांनी आपण हे पुस्तक लिहिल्याचाच इन्कार केला; मात्र धीरेंद्र झा यांनी गोळवलकर गुरुजींचे हे असत्य सप्रमाण दाखवून दिले. गोळवलकरांनी हे पुस्तक लिहिल्याने संघाचा विचार सुस्पष्टपणे मांडला गेला. देशाच्या नव्याने सुरू होणाऱ्या वाटचाली साठी विविध संकल्पचित्रे मांडली जात असताना कोणत्या दिशेने जायचे नाही, हे समजणेही जरुरीचे होते. त्या अनुषंगाने गोळवलकरांचे योगदान महत्त्वाचे मानले पाहिजे.

**– डॉ. श्रीरंजन आवटे**
poetshriranjan@gmail.com

Scanned with OKEN Scanner

23/1/24

# संविधानासाठी मशागत

## काँग्रेसचे स्वातंत्र्य मिळवून देण्यात अमूल्य योगदान आहेच, मात्र त्याहून मोठे योगदान आहे नव्या देशाच्या संविधानाची मशागत करण्यामध्ये...

**संविधानभान**

**संविधान सभा** स्थापन होण्यापूर्वीच चहूबाजूंनी वैचारिक मंथन झाले. अशाच वैचारिक घुसळणीतून काँग्रेसचे वार्षिक ठराव तयार झाले आणि मांडले गेले. नेहरू अहवाल, कराची ठराव ते सिमला परिषद या सगळ्यामधून नवा देश कसा असेल, याचे एक चित्र रेखाटले जात होते. यातून ब्रिटिशांना प्रतिसाद द्यायची रणनीती आणि भारतीय एकतेची रचना या दोन्ही बाबी आकाराला येत होत्या.

दुसऱ्या बाजूला एम. एन. रॉय आणि श्रीमन नारायण अग्रवाल हे साम्यवादी, गांधीवादी संविधानाचे आराखडे मांडत होते. तिसऱ्या बाजूला सामाजिक समतेच्या चळवळीने भारताची सामाजिक वीण घट्ट करण्याचा प्रयत्न केला होता आणि या तीनही प्रवाहांमध्ये काही साधर्म्यबिंदू होते.

उदाहरणार्थ, कराची ठरावाने (१९३१) सर्वांना प्राथमिक शिक्षण मिळाले पाहिजे, हा मुद्दा मांडला. १८८२ साली महात्मा फुले यांनी हंटर आयोगासमोर सर्वांना समान आणि मोफत शिक्षण मिळाले पाहिजे, अशी मागणी केली. त्यानंतर राजर्षि शाहू महाराजांनी कोल्हापूर संस्थानात सर्वांसाठी प्राथमिक शिक्षणाची तरतूद केली. एम. एन. रॉय आणि श्रीमन नारायण अग्रवाल यांनी मांडलेल्या मसुद्यातही प्राथमिक शिक्षणाबाबत ही तरतूद आहे. पुढे स्वतंत्र संविधानात मार्गदर्शक तत्त्वांमध्ये त्याचा समावेश झाला.

अगदी त्याचप्रमाणे गर्भवतींना हक्काची सुट्टी मिळाली पाहिजे, हे कराची ठरावात म्हटले होते. एम. एन. रॉय यांचा मसुदा तर पूर्ण कामगारकेंद्री होता. गर्भवतींना आणि बाळाचा जन्म झाल्यानंतरही स्त्रियांना हक्काची रजा असली पाहिजे, याकरता 'मॅटर्निटी बेनेफिट ॲक्ट' लागू व्हावा म्हणून डॉ. आंबेडकरांनी मजूरमंत्री असताना प्रयत्न केले.

पेरियार रामास्वामी यांनी आत्मसन्मान आणि समाजवाद याबाबतचा ठराव मांडणारी परिषद १९३३ साली इरोड येथे आयोजित केली होती. त्याच वेळी काँग्रेसमध्ये सुभाषचंद्र बोस आणि पं. नेहरू समाजवादी मूल्यांचा आग्रह धरत होते तर साम्यवादी चळवळ अगदी रशियाच्या क्रांतीने भारावून जाऊन नव्या समताधिष्ठित समाजाची स्वप्ने मांडत होती.

थोडक्यात, सामाजिक समतेची चळवळ आणि राजकीय स्वातंत्र्य चळवळ एकत्र येते असे अनेक बिंदू दिसून येतात. हे दोन्ही प्रवाह परस्परविरोधी नव्हते. त्यांच्यात मतभेदाचे मुद्दे जरूर होते मात्र मुख्य मुद्दा होता तो प्राधान्यक्रमाचा. आधी स्वातंत्र्य की समता, असा तो प्रश्न होता. स्वातंत्र्य मिळाल्यानंतर पूर्वीची कर्मठ व्यवस्था असू नये, याकरता सामाजिक समतेची चळवळ आग्रही होती तर राजकीय स्वातंत्र्याची चळवळ साम्राज्यवादाच्या गुलामगिरीतून मुक्त होण्यासाठी प्रयत्नांची शर्थ करत होती.

दुसऱ्या महायुद्धानंतर ब्रिटिशांची अवस्था अधिक बिकट झाली होती. वसाहतींना स्वातंत्र्य देणे अपरिहार्य झाले होते. स्वातंत्र्य चळवळीचा जोर वाढला होता. यथावकाश स्वातंत्र्य मिळालेही. काँग्रेसचे आणि एकुणात राष्ट्रीय चळवळीचे स्वातंत्र्य मिळवून देण्यात अमूल्य योगदान आहेच मात्र त्याहूनही मोठे योगदान आहे ते नव्या देशाच्या संविधानाची मशागत करण्यामध्ये. या मशागतीमध्ये राजा राममोहन रॉय यांच्यापासून ते बेहरामजी मलबारी, र. धो. कर्वे, लोकहितवादी, महर्षी शिंदे ते आंबेडकर-पेरियारांपर्यंत सर्वांनीच विकसित केलेल्या सामाजिक समतेच्या चळवळीचाही तितकाच वाटा आहे. या दोन्ही चळवळींचा संगम संविधानसभेत झाला. या संविधानाच्या मशागतीसाठी देशाने किंमत चुकवली. मुस्लीम जमातवाद नाकारला, अखेरीस देशाची फाळणी झाली. राष्ट्रपिता गांधींची हत्या झाली. हे सारे टाकीचे घाव सोसत देशाच्या संविधानाची मशागत झाली. त्यामुळेच देशाने पारतंत्र्याच्या बेड्या झुगारून दिल्या, स्वातंत्र्याला कवेत घेतले आणि विषमतेला नकार देत समतेला होकार दिला!

- डॉ. श्रीरंजन आवटे
poetshriranjan@gmail.com

Scanned with OKEN Scanner

# ‘मुलखावेगळ्या राजा’चे संविधान...

**गांधीजींच्या विचारांनी प्रेरित झालेल्या एका राजाने आपल्या संस्थानात नवे संविधान लागू केले... हा प्रयोग अविश्वसनीय आणि लक्षवेधी होता.**

**संविधानभान**

**स्वतंत्र होऊ** पाहणाऱ्या भारताच्या संविधानासाठी तेव्हा मांडले जात असलेले वेगवेगळे मसुदे लिखित स्वरूपात उपलब्ध आहेत. मात्र नव्या संविधानासाठीचे प्रयत्न केवळ पुस्तकी नव्हते. काही ठिकाणी प्रत्यक्ष संविधान लागू करण्याचे प्रयोग झाले.

ब्रिटिश काळात भारत दोन भागांत विभागला होताः ब्रिटिश भारत आणि संस्थाने. अनेक संस्थानांमध्ये राजेशाही होती. काही संस्थानांमध्ये वेगळे प्रयोग झाले. त्यापैकीच एक औंधचे. इतर संस्थानांच्या तुलनेत ते छोटे म्हणजे ७२ खेड्यांचे होते. ही खेडी सलग नव्हती. ती सांगली, सातारा, सोलापूर आणि विजापूर जिल्ह्यात विभागलेली होती. कऱ्हाडला असलेली गादी इंग्रजांच्या ताब्यामुळे औंधला गेली.

या संस्थानाचे शेवटचे राजे होते भवानराव पंतप्रतिनिधी. ते महात्मा गांधींच्या विचारांनी भारावलेले होते. स्वयंपूर्ण खेडे आणि स्वराज्य या कल्पना प्रत्यक्षात आणल्या पाहिजेत, असे त्यांचे मत होते. लोकांची सत्ता स्थापित करायची तर आपण गांधींचा सल्ला घेतला पाहिजे असा सल्ला मॉरिस फ्रीडमन यांनी त्यांना दिला. फ्रीडमन हे भवानरावांचे पुत्र आप्पासाहेब यांचे मित्र. फ्रीडमन यांच्या सल्ल्यानुसार भवानरावांनी वर्ध्यामध्ये गांधींची भेट घेतली. स्वराज्य या विचाराविषयी चर्चा झाली. त्यानुसार १९३८ साली भवानराव पंतप्रतिनिधींनी सत्तेचा त्याग केला आणि लोकांची सत्ता स्थापन करण्याची घोषणा केली. २१ जानेवारी १९३९ रोजी त्यांनी औंध संस्थानाचे नवे संविधान लागू केले.

भवानराव आधीपासूनच स्वातंत्र्य चळवळीशी जोडलेले असल्याने राजासारखे जगणे त्यांना नामंजूर होते. त्यामुळेच १९१७ पासून त्यांनी औंध संस्थानांमधील गावांमध्ये स्थानिक स्वराज्य संस्थांची स्थापना केली होती. औंधचे संविधान लागू झाल्यावर फ्रीडमन यांनी गावोगावी जाऊन लोकांसाठी कार्यालये स्थापन केली. स्वतंत्रतापूर येथे मुक्त तुरुंग स्थापन केला. आरोपींना मुक्त तुरुंगात राहून स्वसंयमाने स्वतःत बदल घडवून आणणे त्यांना अपेक्षित होते. या नव्या संविधानानुसार सर्व लोकांना मतदानाचा हक्क देण्यात आला मात्र साक्षर लोकांना मतदानाचा हक्क देण्यात यावा असे गांधींनी ‘हरिजन’मध्ये लिहिले. त्यामुळे भवानरावांनी औंध संस्थानातील निरक्षरता कमी करण्यासाठी २० हून अधिक शाळांची स्थापना केली. संस्थानामध्ये प्राथमिक शिक्षण समान व मोफत असेल, अशी तरतूद केली. पंचायत राज व्यवस्थेचा अनोखा प्रयोग या संस्थानात सुरू झाला. ग्रामस्वराज्य आणि सामाजिक एकता यांवर आधारलेले संविधान लागू झाले. संस्थानात निवडणुका झाल्या आणि आप्पा पंत हे नवे पंतप्रधान झाले. पुढे १९४३ मध्ये रामाप्पा बिद्री पंतप्रधान झाले. स्वातंत्र्य मिळाल्यानंतर औंध संस्थान स्वतंत्र भारतात सामील झाले. छोटे संस्थान असले तरी त्यांनी राबवलेला प्रयोग अनोखा होता म्हणूनच पं. नेहरू हा प्रयोग पाहण्यासाठी औंध संस्थानात आले होते. शिवाय ‘चले जाव’ चळवळ आणि प्रतिसरकार स्थापना यामध्ये सक्रिय असणाऱ्या क्रांतिकाऱ्यांना या संस्थानाची मदत झाली होती.

इंदिरा रॉदरमंड यांनी ‘औंध एक्सपरिमेंट’ नावाचे पुस्तक लिहीत गांधीवादी संविधान तळागाळापासून लोकशाही स्थापन करण्याचा महत्त्वपूर्ण प्रयत्न असल्याचे म्हटले आहे. आप्पा पंतांनी तर ‘मुलुखावेगळा राजा’ असे पुस्तकच भवानराव पंतप्रतिनिधींविषयी लिहिले. भवानराव हे अनेक अर्थांनी मुलुखावेगळे होते. सर्वांना योगा, सूर्यनमस्कार करायला लावून शारीरिक आरोग्य तंदुरुस्त ठेवायला सांगणारे बहुआयामी भवानराव १९३५ साली झालेल्या मराठी साहित्य संमेलनाचे अध्यक्षही होते. येनकेनप्रकारेण सत्ताप्राप्तीचे प्रयत्न होतानाच्या काळात, सत्तेचा त्याग करत गांधीवादी संविधान राबवण्याचा भवानरावांचा प्रयत्न आजही अविश्वसनीय वाटावा असाच, मात्र नवा मार्ग दाखवू शकेल इतका लक्षवेधी आहे!

– डॉ. श्रीरंजन आवटे

25/1/24

# राजेशाही चौकटीत लोकशाहीची पेरणी

**सारी भारतीय संस्थाने कर्मठ असल्याचे जे चित्र उभे केले जाते ते खरे नाही. काही संस्थानांमध्ये प्रागतिक संविधानास पूरक वातावरण होते...**

## संविधानभान

**औंधच्या संस्थानात** ज्याप्रमाणे अनोखा प्रयोग झाला तसे प्रयोग आणखी काही संस्थानांत झाले होते. इंदौरचे दिवाण सर तंजोर माधवराव यांनी १८७४ साली संविधान लिहिले होते. प्रभावी प्रशासनासाठी हे संविधान उपयुक्त होते. या संविधानाने कायद्याचे राज्य स्थापित केले होते. अभिव्यक्तीचे आणि सभेचे स्वातंत्र्य, माध्यमस्वातंत्र्य मान्य केले होते. अगदी खासगी संपत्तीचा हक्कही असला पाहिजे, अशी तरतूद त्यात होती. धार्मिक सहिष्णुतेच्या तत्त्वाला महत्त्व दिले होते. प्रा. राहुल सागर यांनी सर तंजोर माधवराव यांच्यावर 'प्रोग्रेसिव्ह महाराजा' हे पुस्तक लिहिले. २०२२ मध्ये ऑक्सफर्डने हे पुस्तक प्रकाशित केले.

या प्रयत्नाप्रमाणेच म्हैसूर संस्थानातला प्रयोगही लक्षवेधक होता. या संस्थानात लोकशाही होती. वडियार राजांनी कल्याणकारी राज्य स्थापन करण्याचा तिथे प्रयत्न केला होता. चमराजेंद्र वडियार राजे सत्तेवर आले आणि १८८१ पासून या संस्थानात निवडणुका होऊ लागल्या. येथे प्रजा प्रतिनिधी सभा हे लोकप्रतिनिधींचे सभागृह स्थापित केले होते. या संस्थानात राजकीय पक्षीय स्पर्धा आकारास आली होती. काँग्रेस या संस्थानात सक्रिय होती. तिथे सत्तेचे विकेंद्रीकरण केले होते. जिल्हा मंडळ, तालुका मंडळ आणि महापालिका अशा त्रिस्तरीय पद्धतीने पंचायतराज रचना अस्तित्वात आली होती. पुढे स्वातंत्र्य आंदोलनात म्हैसूर संस्थानाची क्रांतिकारकांना मदत झाली. १९३८ साली म्हैसूर संस्थानात 'ध्वज सत्याग्रह' सुरू झाल्यावर पोलिसांनी गोळीबार केला आणि तीव्र संघर्ष सुरू झाला. मात्र एकुणात या संस्थानाने लोकशाहीसाठी अनुकूल जमीन तयार केली.

अगदी तसेच कोल्हापूर संस्थानात शाहू महाराजांनी केलेले कार्य काळाच्या कितीतरी पुढे होते. शाहू महाराजांनी २६ जुलै १९०२ रोजी कोल्हापूर संस्थानातील ५० टक्के शासकीय नोकऱ्या मागासलेल्या वर्गासाठी राखीव ठेवल्याचा जाहीरनामा काढला. राखीव जागांचे धोरण अमलात आणणारे शाहू महाराज हे भारतातील पहिले राज्यकर्ते असावेत. अस्पृश्यतेचे उच्चाटन हे शाहू महाराजांनी आपले जीवितकर्तव्य मानले. संस्थानातील शाळा, पाणवठे, विहिरी, दवाखाने, कचेऱ्या इ. सार्वजनिक ठिकाणी अस्पृश्यता पाळण्यास त्यांनी कायद्याने प्रतिबंध केला. १९१८-१९ मध्ये त्यांनी त्यासाठी अनेक वटहुकूम जारी केले आणि अस्पृश्यांना सरकारी नोकरीत घेतले. समाजातील तलाठ्यासारख्या प्रतिष्ठेच्या जागा दिल्या. त्यांच्यापैकी अनेकांना माहूत, हूलस्वार, पोलीस, स्वतःचे मोटारचालक म्हणून नेमले. तसेच महार-वतन खालसा करून महारांची वेठबिगारीतून आणि गुन्हेगार मानल्या गेलेल्या जातींची 'हजेरी' पद्धतीतून मुक्तता केली. फासेपारधी, कोरवी, माकडवाले यांसारख्या भटक्या व विमुक्त जातींना जवळ करून त्यांचे जीवन स्थिर केले. त्यांना आपले रक्षक म्हणून नेमले. १९१८ साली खेड्यापाड्यांतील बलुतेदारांनाही बलुतेपद्धतीतून मुक्त केले. समाजातील सर्व उद्योगधंदे त्यांच्यासाठी खुले केले. १९२० साली जोगिणी व देवदासी प्रथेस प्रतिबंध करणार कायदा केला. सर्वांना समान व मोफत शिक्षणाचा हक्क शाहू महाराजांनी दिला. सामाजिक न्यायाचे तत्त्वच शाहू महाराजांनी अमलात आणले.

थोडक्यात, सारी भारतीय संस्थाने मागास आणि कर्मठ असल्याचे जे चित्र उभे केले जाते ते तितकेसे खरे नाही, हे वरील तीनही उदाहरणांवरून दिसून येते. काही संस्थानांमध्ये प्रागतिक संविधानास पूरक वातावरण होते. संस्थानांच्या राजेशाहीच्या चौकटीतही लोकशाही फुलत होती. काँग्रेस या संस्थानासोबत संवादी होती त्यामुळेच काही मोजक्या संस्थानांचा अपवाद वगळता ५०० हून अधिक संस्थाने स्वतंत्र भारतात सामील झाली.


**- डॉ. श्रीरंजन आवटे**

poetshriranjan@gmail.com



Reg.No. N.C.C.C.3591 4309 vc-2 Tal-Khatav Dist-Satara



Scanned with OKEN Scanner

26/1/24

Arts and Commerce College
Reg.No. N.C.C.C.3591
Dist-Satara

# नव्या प्रजासत्ताकाची नांदी...

**कॅबिनेट मिशन योजनेने भारतीय संघराज्याचा आराखडा मांडला. या योजनेनुसार भारताची स्वतंत्र संविधानसभा स्थापन झाली...**

**संविधानभान**

**दुसरे महायुद्ध** सुरू झाल्यावर ब्रिटिशांसोबतची रणनीती काय असली पाहिजे, याविषयी काँग्रेसमध्ये वाद होऊ लागले. ब्रिटिश इटली, जर्मनी, जपान या अक्ष राष्ट्रांच्या विरोधात लढत होते. त्यामुळे शत्रूचा शत्रू तो आपला मित्र या सरळसोट आकलनाप्रमाणे अक्ष राष्ट्रांची मदत घ्यावी, असे सुभाषचंद्र बोस यांच्यासारख्यांचे मत होते. साम्राज्यवाद विरुद्ध फॅसिझम असे दुसऱ्या महायुद्धाचे वैचारिक रणांगण होते. नेहरूंचा या साम्राज्यवादालाही विरोध होता आणि फॅसिझमलाही. अक्ष राष्ट्रांमधील लष्करशाहीच्या, फॅसिझमच्या धोक्याचे त्यांना नेमके भान होते. साम्राज्यवादी शक्तींशी वाटाघाटी शक्य होत्या, मात्र फॅसिस्ट शक्तींशी संवादही शक्य नव्हता आणि त्यांनी केलेला संहार भीषण होता. त्यामुळे ब्रिटिशांना सशर्त सहकार्य करायचे आणि स्वातंत्र्याच्या दिशेने ठोस पाऊल टाकायचे, असे ठरले. हे पाऊल निर्णायक होते.

१९४२ ला 'चले जाव' चळवळ अधिक तीव्र झाली आणि कायदेशीर पातळीवरचा लढाही दोन पावले पुढे गेला. भारताला स्वराज्य हवे, स्वतंत्र संविधान हवे ही मागणी ब्रिटिश सरकार मान्य करत नव्हते त्यात दुसरे महायुद्ध आणखी भडकले आणि ब्रिटनमध्ये मजूर पक्षाच्या आघाडीचे सरकार आले. त्यामुळे ब्रिटिशांना भारतीयांच्या मागण्यांकडे अपरिहार्यपणे लक्ष द्यावे लागले. ब्रिटिश सरकारने सर स्टॅफर्ड क्रिप्स यांना नवा प्रस्ताव देऊन भारतात पाठवले. ब्रिटिश साम्राज्याच्या अंतर्गत स्वराज्य (डॉमिनियन स्टेटस) देण्याचा प्रस्ताव क्रिप्स यांनी



मांडला. तसेच इतर कॉमनवेल्थ राष्ट्रांच्या समकक्ष दर्जा देण्याचाही मुद्दा मांडण्यात आला. संस्थानांना स्वतंत्र रहायचे असल्यास त्यांना तो अधिकार असेल, असे या आयोगाने मांडले.

धार्मिक आधारावर या देशाच्या दोन संविधानसभा असतील, असा मुस्लिम लीगचा आग्रह होता. त्यामुळे लीगने प्रस्तावाला नकार दिला तर काँग्रेस पूर्ण स्वातंत्र्याची मागणी करत असल्याने काँग्रेसनेही क्रिप्स आयोगाच्या प्रस्तावाला विरोध केला.

ब्रिटिशांनी आधीच फुटीरतेची बीजे पेरली होती. तरीही क्रिप्स आयोगानंतर मुस्लीम लीग आणि काँग्रेस यांच्यामध्ये सामोपचार घडवण्याचे अनेक प्रयत्न त्यांनी केले. अखेरीस ब्रिटिशांनी कॅबिनेट मिशन योजना मांडली. लॉर्ड पॅथिक लॉरेन्स, सर स्टॅफर्ड क्रिप्स आणि ए. व्ही. अलेक्झांडर या तिघांनी ही योजना मांडली होती. योजना अतिशय सविस्तर आणि तपशीलवार होती. या योजनेने भारतीय संघराज्याचा आराखडा मांडला. सुरुवातीला याविषयी काँग्रेस आणि मुस्लीम लीग यांनी सहमती दिली मात्र पाकिस्तान मान्य न केल्याने लीगने पुन्हा विरोध केला. धर्माधारित प्रांतीय रचनेमुळे काँग्रेसने विरोध केला. दरम्यान या योजनेनुसार संविधान सभेसाठी निवडणुका झाल्या. काँग्रेस आणि मुस्लीम लीगचे सदस्य प्रांतिक मंडळातून निवडून आले. अखेरीस संविधान सभेच्या दिशेने पाऊल पडले.

काँगेस आणि मुस्लीम लीगमधील मतभेद वाढले. अखेरीस ६ डिसेंबर १९४६ रोजी ब्रिटिशांनी एक निवेदन प्रसिद्ध केले, ज्याद्वारे दोन संवैधानिक सभांना मान्यता दिली गेली. याचाच परिणाम म्हणून ९ डिसेंबर १९४६ रोजी भारताच्या स्वतंत्र संविधानसभेची स्थापना झाली, तेव्हा मुस्लीम लीगचे सदस्य गैरहजर होते; मात्र भारतासाठी एका नव्या पर्वाला सुरुवात झाली होती. सुमारे तीन वर्षे प्रचंड कष्ट घेत, वाद-संवादाची परंपरा पुढे नेत भारताचे संविधान तयार झाले आणि २६ जानेवारी १९५० रोजी प्रजासत्ताकाची स्थापना केली. नव्या भारताच्या स्वप्नाची ती नांदी होती. जॉन लेननच्या 'इमॅजिन' या गाण्यातील ओळी आहेत: 'यू मे से मी अ ड्रीमर, बट आय एम नॉट द ओन्ली वन.' अगदी त्याचप्रमाणे भारतातही हे स्वप्न पाहणारा कुणी एकजण नव्हता. देशाने सामूहिक स्वप्न पहायला सुरुवात केली होती!

**- डॉ. श्रीरंजन आवटे**
poetshriranjan@gmail.com

Scanned with OKEN Scanner

# संविधान सभेचे सर्वसमावेशक नेतृत्व

**संविधान सभेतील बहुसंख्य सदस्य उच्चवर्णीय होते, मात्र मनात व्यापक आस्था असल्यामुळेच सर्वांना समान स्थान देणे त्यांना शक्य झाले…**

**संविधानभान**

**संविधान सभेतील** सदस्य ब्रिटिश भारतातील आणि भारतीय संस्थानांमधील होते. ब्रिटिश भारतातील सदस्य निवडून आले होते, तर संस्थानातील नामनिर्देशित (नॉमिनेटेड) होते. हे सर्व सदस्य सर्वांचे प्रतिनिधित्व करत होते अथवा नाही, याबाबत सतत चिकित्सा होते. संविधान सभेमधील नेतृत्वाचे पक्ष, विचारधारा, सामाजिक स्थान असे विविध मुद्द्यांवरून विश्लेषण होते आणि असे विश्लेषण सर्वांगीण आकलनासाठी आवश्यक आहे.

सुरुवातीला संविधान सभेत निवडून आलेले २९६ सदस्य होते. फाळणीनंतर त्यांची संख्या झाली २२९. या सर्व सदस्यांना चार गटांमध्ये विभागता येतेः १. काँग्रेसचे प्रतिनिधी २. काँग्रेसच्या तिकिटावर विजय प्राप्त केलेले स्वतंत्र उमेदवार. ३. बिगर-काँग्रेसी प्रांतिक विधिमंडळाचे प्रतिनिधी ४. फाळणीनंतर पाकिस्तानात जाण्यास नकार दिलेले मुस्लीम लीगचे प्रतिनिधी. अर्थातच यामध्ये काँग्रेसचे वर्चस्व होते. काँग्रेसचे १९२ सदस्य संविधान सभेत महत्त्वाची भूमिका बजावत होते. जॉन मथाई, डॉ. बाबासाहेब आंबेडकर, एम. आर. जयकर यांसारखे स्वतंत्र उमेदवार काँग्रेस पक्षात नव्हते मात्र काँग्रेसच्या तिकिटावर ते निवडून आले.

महिलांसाठी राखीव जागा नव्हत्या मात्र हंसा मेहता, सरोजिनी नायडू, अम्मा स्वामीनाथन यांसारख्या १५ महिलांचा संविधान सभेत प्रवेश होऊ शकला. फाळणीनंतर मुस्लीम लीगचे २९ सदस्य भारतात राहिले. त्यापैकी एक सय्यद मोहम्मद सादुल्ला हे तर पुढे मसुदा समितीचे सदस्यही झाले. अकाली दलाचे उज्जल सिंग हे पूर्व पंजाबमधील होते. काँग्रेसबाहेरचे सदस्य कमी होते मात्र त्यांची भूमिका महत्त्वाची मानली गेली.

ग्रॅनवील ऑस्टिन यांनी 'द इंडियन कॉन्स्टिट्यूशनः कॉर्नरस्टोन ऑफ अ नेशन' या त्यांच्या पुस्तकात २० सदस्यांची भूमिका प्रमुख होती, असे म्हटले आहे. त्यापैकी १५ सदस्य काँग्रेसचे, तीन स्वतंत्र प्रतिनिधी, एक संस्थानातील प्रतिनिधी तर एक मुस्लीम लीगचे. त्यातही संविधान सभेतील चार सदस्य अनेक बाबतींत पुढाकार घेत होते, असे ऑस्टिन नोंदवतात. पं. नेहरू, सरदार पटेल, राजेंद्र प्रसाद आणि मौलाना आझाद हे ते चार सदस्य. शिबानी किंकर चौबे यांनी ऑस्टिन यांच्या मांडणीमध्ये थोडा बदल करत संविधान सभेतील नेतृत्वाला तीन गटांत विभागले आहे- १. काँग्रेस पक्षांतर्गत नेतृत्वः नेहरू, पटेल, प्रसाद आणि आझाद यांच्यानंतर के. एम. मुन्शी, जे. बी. कृपलानी आणि सी. राजगोपालचारी अशी दुसरी नेतृत्वाची फळी होती. २. काँग्रेसबाहेरचे नेतृत्व- अल्लादी कृष्णास्वामी अय्यर, एन. गोपालस्वामी अय्यंगार आणि डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे नेतृत्व संविधान सभेत महत्त्वपूर्ण होते. ३. 'मध्यममार्गी' नेतृत्वः या गटात के. संथानम, टी. टी. कृष्णामचारी यांसारख्या सदस्यांचा समावेश होता. त्यांच्या कायद्याच्या अभ्यासामुळे संविधान सभेत त्यांचे म्हणणे गंभीरपणे ऐकले गेले.

यापैकी बहुतांश सदस्य वकील होते. त्यामुळे संविधानाची भाषा काहीशी क्लिष्ट आणि पारिभाषिक झाली, असा टीकेचा सूरही लावला जातो. संविधान सभेतील बहुसंख्य सदस्य हे उच्चवर्णीय, उच्चशिक्षित, शहरी भागांतील होते, हेदेखील सत्य आहे. तसेच ९० टक्क्यांहून अधिक सदस्य हिंदू होते. महिलांचे प्रमाण केवळ १५ टक्के होते.

संविधान सभेत प्रत्येक समाज घटकातील प्रतिनिधींचा समावेश नव्हता, मात्र सर्व समाज घटकांना न्याय मिळेल, अशी रचना होती. सर्वजण शोषितांचे मुद्दे, आस्था, प्रश्न उपस्थित करणारे होते. केवळ नाममात्र प्रतिनिधित्वापेक्षा मौलिक मुद्दे उपस्थित करणारे नेतृत्व महत्त्वाचे असते. संविधान सभेतील नेत्यांच्या मनात व्यापक आस्था होती, त्यामुळेच संकुचित डबक्यातून बाहेर पडून सर्वांना समान स्थान देणे त्यांना शक्य झाले.

– डॉ. श्रीरंजन आव

Scanned with OKEN Scanner

Reg.No. N.G.C.C.3591 4309 vc-2 Tal-Khatav, Dist-Satara

29/11/24

29/11/24

# नव्या संविधानाची चौकट साकारणारे हात...

## राजकीय परिस्थिती झपाट्याने बदलत असताना बी. एन. राव यांनी संविधान मसुद्याच्या कामाला सुरुवात केली होती...

**संविधानभान**

**कॅबिनेट मिशन** योजनेने संविधान सभेच्या निर्मितीला मान्यता दिली. संविधान सभेकरता निवडणुका घ्याव्या लागणार होत्या. या निवडणुकांमध्ये मुख्य लढत ही कॉंग्रेस विरुद्ध मुस्लीम लीग अशी असणार होती. 'चले जाव' चळवळीचा जयघोष करत कॉंग्रेस प्रचार करत होती तर 'पाकिस्तान' निर्मिती कशासाठी हवी हे सांगत मुस्लीम लीग प्रचार करत होती. जमातवादामुळे वातावरण अधिक कलुषित झालेले. अशा साऱ्या पार्श्वभूमीवर ब्रिटिश सरकारने गव्हर्नर सचिवालयात बी. एन. राव यांच्यावर विशेष जबाबदारी सोपवली होती. कॉंग्रेस आणि मुस्लीम लीगला स्वीकारार्ह असा मसुदा तयार करण्याचे काम बी. एन. राव यांच्यावर सोपवले होते.




भारताची एकता टिकवून ठेवत नव्या संविधानाची चौकट तयार करण्याचे काम अतिशय खडतर होते. सनदी सेवेचा आणि कायद्याच्या ज्ञानाचा मोठा अनुभव असलेल्या बी एन राव यांनी १९ पानांचा मसुदा लिहीत जानेवारी १९४६ मध्ये एक संवैधानिक चौकट मांडली. यानुसार नवा भारत कॉमनवेल्थचा भाग असेल. यात तीन प्रमुख घटक असतील : (१) हिंदुस्तान संघराज्य, (२) पाकिस्तान संघराज्य (३) भारतीय संस्थाने आणि आदिवासी प्रदेश. या तीनही घटकांना सार्वभौमत्व असेल, स्वातंत्र्य असेल; मात्र त्यांचे संरक्षण, परराष्ट्र संबंध आणि संज्ञापन याबाबत समान धोरण असेल. राव यांनी पाकिस्तानच्या निर्मितीला टाळत एक स्वतंत्र प्रांतिक संघटन म्हणून रचना करण्याचा प्रयत्न केला होता. धर्मांचा उल्लेख न करता प्रांतिक रचनेची भाषा वापरली. राव यांनी त्यांच्या परीने कायदेशीर समन्वयाची एक वाट चोखाळली होती. याशिवाय या आराखड्यात कार्यकारी मंडळ आणि कायदेशीर मंडळ यांचे काम काय असेल, याविषयी मूलभूत तरतुदी राव यांनी केल्या होत्या. हा मसुदा प्रामुख्याने संघराज्याच्या रचनेवर भाष्य करणारा होता. एका समूहाचे दुसऱ्या समूहावर वर्चस्व असता कामा नये आणि भारताची एकात्मता अबाधित रहावी, या उद्देशाने आपण हा आराखडा तयार केला आहे, असे राव सांगतात.

संघराज्यवाद आणि कायदेमंडळ-कार्यकारी मंडळ या संदर्भातल्या तरतुदींची मांडणी केल्यानंतर राव यांनी म्हटले आहे की, भारताने मूलभूत मुद्द्यांकडे युद्धपातळीवर लक्ष देत जबाबदारी स्वीकारण्याची आवश्यकता आहे : (१) भारतात आणि भारताबाहेर शांतता प्रस्थापित करणे, (२) पोषणमूल्याची पातळी वाढवणे आणि एकुणात भारतीयांचे जीवनमान उंचावणे, (३) सर्वांना समान शैक्षणिक संधीची भूमी तयार करणे, (४) सार्वजनिक आरोग्य व्यवस्था सुधारणे. आजही हे चार मुद्दे किती महत्वाचे आहेत, हे लक्षात येते.

सुमन शर्मा यांनी 'स्टेट बाउंड्री चेंजेस इन इंडिया' या पुस्तकात म्हटले आहे की राव यांनी मांडलेल्या या आराखड्याचा परिणाम कॅबिनेट मिशन योजनेवर पडला. या योजनेने भारताचे संवैधानिक भवितव्य ठरणार होते. त्यामुळेच राव यांचे हे योगदान मौलिक ठरते. अर्थात त्यानंतरही प्रांतिक रचनेबाबत वाद उदभवलेच. पुढे बी एन राव यांची संविधान सभेचे सल्लागार म्हणून नेमणूक झाली आणि स्वतंत्र संविधान सभेच्या मसुदा समितीतही त्यांनी मोलाची भूमिका बजावली.

डॉ बाबासाहेब आंबेडकरांनी म्हटले होते की संविधान निर्मितीचे संपूर्ण श्रेय मला दिले जाते मात्र त्यातला मोलाचा वाटा बी एन राव यांचाही आहे. राव यांनी स्वतंत्र संविधान सभा निर्माण होण्यापूर्वीच असा आराखडा मांडल्याने वैचारिक मंथनास मदत झाली. कालांतराने भारताची एकता टिकवण्याचे स्वप्न भंगले तरी नवी दिशा सापडण्यास मदत झाली. यश येवो की अपयश, एकात्मतेसाठीचे पसायदान मागत राहिले पाहिजे, हेच राव यांचा प्रयत्न सांगतो.

**- डॉ. श्रीरंजन आवटे**
poetshriranjan@gmail.com

Scanned with OKEN Scanner

Arts and Commerce College Mayani
Reg.No. N.G.C.C.3591 4309 vc-2
Tal-Khatav, Dist-Satara

३१/१/२४

# संविधान सभेचे वैचारिक रिंगण

**संविधान सभेच्या सदस्यांत वाद होते; मात्र वेगळी विचारधारा असणाऱ्याला शत्रू मानले जात नव्हते...**

## संविधानभान

**संविधान सभा** सर्वसमावेशक असेल, असा प्रयत्न केला गेला असला तरीही संविधान सभेवरील टीकेचा पहिला आणि मूलभूत मुद्दा होता तो प्रतिनिधित्वाचा. संविधान सभा ही सर्वांचे प्रतिनिधित्व करत नव्हती कारण १९४६ च्या प्रांतिक विधिमंडळाच्या निवडणुकीत सर्वांना मतदानाचा हक्क नव्हता. हा मुद्दा तत्त्वतः योग्य असला तरी सर्वांना मतदानाचा हक्क देऊन निवडणुका घेणे अव्यवहार्य होते. उलटपक्षी, ब्रिटिशांनी टप्प्याटप्प्याने मतदानाचा हक्क देत एक निश्चित, विहित प्रक्रिया राबवत संविधान सभेची निर्मिती केली, हे विशेष.

या संविधान सभेत काँग्रेसचे वर्चस्व होते, हा आणखी एक टीकेचा मुद्दा. संविधान सभा स्थापन झाली तोवर काँग्रेसने ६१ वर्षे पूर्ण केली होती. काँग्रेस हा स्वातंत्र्य आंदोलनात सर्वांत आघाडीवर असलेला राजकीय पक्ष होता. जनसामान्यांमध्ये विलक्षण लोकप्रिय असा हा पक्ष होता. त्यामुळे संविधान सभेमध्ये या पक्षाचे प्राबल्य असणे स्वाभाविकच होते; मात्र काँग्रेस हा एक पक्ष असण्याऐवजी रजनी कोठारी नोंदवतात त्याप्रमाणे 'काँग्रेस व्यवस्था' होती. त्यामुळे या पक्षाच्या अंतर्गतच वेगवेगळ्या विचारप्रवाहांचे प्रतिनिधित्व करणारे लोक होते. त्याचप्रमाणे संविधान सभेतही वेगवेगळ्या विचारधारांवर निष्ठा असणारे लोक होते.

संविधान सभेतले सोमनाथ लाहिरी हे कम्युनिस्ट विचारांनी प्रभावित झालेले तर पं. नेहरू लोकशाही समाजवादाचा विचार मांडणारे. श्यामाप्रसाद मुखर्जी हिंदू महासभेचे तर डॉ. बाबासाहेब आंबेडकर जातीअंत करत समताधिष्ठित समाजाचे स्वप्न पाहणारे. राजेंद्र प्रसादांसारखे कर्मठ हिंदू एका बाजूला तर मौलाना आझादांसारखे परिवर्तनावादी मुस्लीम दुसऱ्या बाजूला. या प्रकारे विविध वैचारिक पार्श्वभूमीतील सदस्य संविधान सभेत होते.

राज्यशास्त्रज्ञ राजीव भार्गव यांच्या मते, संविधान सभेमध्ये गांधींची बिगर-आधुनिक, सामूहिकतेला प्राधान्य देणारी दृष्टी, नेहरूंचा लोकशाही समाजवादाचा विचार, बाबासाहेब आंबेडकर यांचा उदार लोकशाहीचा विचार, के. टी. शाह यांची मूलगामी समतावादी दृष्टी आणि हिंदुत्वाची विचारधारा अशा पाच प्रमुख विचारप्रवाहांमध्ये संघर्ष होता. कायदेतज्ज्ञ प्रा. जी. मोहन गोपाल यांनी म्हटले आहे संविधान सभेतला संघर्ष तीन विचारधारांमधला होता. १. संरजामी धर्मसत्ताक राज्याची दृष्टी (फ्यूडल थिओक्रसी) २. आधुनिकता ३. स्वराज.

संस्थानांमधून आलेले राजे, जमीनदार आणि धर्म हेच प्रमुख अधिष्ठान मानणारे सरंजामदार यांच्यासाठी पूर्वीची व्यवस्था लाभदायक होती. त्यामुळे आपले विशेष लाभ नाकारून समतेचे संविधान स्वीकारणे त्यांच्यासाठी कठीण होते. ब्रिटिश आणि एकुणात पाश्चात्त्यप्रणीत आधुनिकतेची एक विशिष्ट दृष्टीही संविधान सभेत मांडली जात होती तर त्याच वेळी स्वयंपूर्ण खेडे केंद्रीभूत मानणारे, भारतीय परंपरेशी नाळ जोडले गेलेले गांधीप्रणीत स्वराजही आग्रहाने मांडले जात होते. संविधान सभेतल्या या वैचारिक रिंगणामुळे भारताच्या भविष्याच्या दिशेविषयी वेगवेगळ्या दृष्टिकोनांतून चर्चा झाली. एकाच पद्धतीने विचार करण्यातून साचलेपण येते. डबक्यातील साचलेपणापेक्षा विविध प्रवाह सम्मीलित होऊन वाहणाऱ्या नदीप्रमाणे विचारांचा प्रवाह असणे हे कोणत्याही लोकशाहीसाठी आवश्यक असते. संविधान सभेने भारताच्या जनमानसातल्या पूर्वग्रहांना प्रश्न विचारले आणि भविष्याचे चित्र रंगवत उत्तर दिले.

थोडक्यात, वेगवेगळ्या विचारांचे लोक संविधान सभेत एकत्र आले होते ते नव्या देशाच्या निर्मितीसाठी. त्यांच्यात वाद होते, मतभेद होते, नव्या देशासाठीची दृष्टी वेगवेगळी होती; मात्र वेगळी विचारधारा असणाऱ्या माणसाला शत्रू मानले जात नव्हते, असा तो काळ होता. त्यामुळेच वाद-प्रतिवाद-संवाद हे लोकशाहीतलं महत्त्वाचं तत्त्व संविधान सभेने आपल्या सामूहिक वर्तनातून सिद्ध केलं. लोकशाही म्हणजे अर्थपूर्ण वाद, असहमती नम्रपणे नोंदवत आदरयुक्त प्रतिवाद आणि सर्जक मंथन असलेला संवाद! संस्कृतमध्ये म्हटलेच आहे 'वादे वादे जायते तत्त्वबोधः' संवादातून सत्यापर्यंत, तत्त्वापर्यंत पोहोचण्याचा रस्ता संविधान सभेने निवडला होता.

**- डॉ. श्रीरंजन आवटे**
poetshriranjan@gmail. com

Scanned with OKEN Scanner

# संविधान सभेत 'हूल जोहार'

८।७।२४

Arts and Commerce C... Reg.No. N.G.C.C.359 4309 vc-2 Tal-Khatav Dist-Satara

## जयपाल सिंग मुंडा यांनी नागरी सेवेतील प्रतिष्ठेची नोकरी सोडून आदिवासींच्या प्रश्नांसाठी आयुष्यभर लढा दिला...

**संविधानभान**

**संविधान सभेत** वेगवेगळ्या पार्श्वभूमीतून आलेले सदस्य होते. त्यापैकी एक महत्त्वाचे नाव होते जयपाल सिंग मुंडा. संविधान सभेमध्ये मुंडा आले ते बिहार प्रांतामधून (आताचे झारखंड). ते स्वतंत्र उमेदवार म्हणून निवडून आले होते.

रांचीपासून ३० किलोमीटर दूर असलेल्या खुंटीमधील टकरी या छोट्याशा गावात त्यांचा १९०३ साली मुंडा जमातीमध्ये जन्म झाला. प्राथमिक शिक्षण पूर्ण करून उच्च शिक्षणासाठी ऑक्सफर्डमधल्या सेंट जॉन्स कॉलेजमध्ये त्यांनी प्रवेश घेतला. अर्थशास्त्रात पदव्युत्तर पदवी प्राप्त केली. या काळात त्यांनी विविध क्षेत्रांत गती प्राप्त केली. येथे असतानाच त्यांनी हॉकीमध्ये प्रावीण्य मिळवले. पुढे त्यांची निवड भारतीय नागरी सेवा (आयसीएस) अधिकारी म्हणून झाली. १९२८ साली ॲमस्टरडॅम येथे ऑलिंपिक सामने होते. भारतीय हॉकी टीमचे कर्णधारपद स्वीकारावे, अशी विनंती त्यांना करण्यात आली. तेव्हा मुंडा हे भारतीय नागरी सेवेत प्रोबेशनवर होते त्यामुळे त्यांना रजा देता येणार नाही, असे सांगण्यात आले. मुंडा यांनी कशाचाही विचार न करता नोकरी सोडली आणि हॉकी संघाचे कर्णधारपद स्वीकारले. त्यावर्षी भारतीय हॉकी संघाने ऑलिंपिकमधील सुवर्णपदक प्राप्त केले. ऑलिंपिकमध्ये देशाने मिळवलेले हे पहिले सुवर्णपदक!

या ऑलिंपिक सामन्यांनंतरही नागरी सेवेत रुजू होण्याचा पर्याय ब्रिटिशांनी त्यांच्या समोर ठेवला होता. मुंडा यांनी तो पर्याय नाकारला आणि आदिवासींवर होणाऱ्या अन्यायाला वाचा फोडली. १९३८ साली आदिवासी महासभा स्थापन झाली होती. १९३९ साली या महासभेच्या अध्यक्षस्थानी त्यांची निवड



जयपाल सिंग मुंडा

झाली. येथून त्यांच्या नेतृत्वात आदिवासींचे मूलभूत प्रश्न तीव्रतेने मांडण्यास सुरुवात झाली.

स्वतः आदिवासी असल्याने अनेक वेळा त्यांनी भेदभावाचा सामना केला होता. आदिवासींचे कसे शोषण केले जाते, हे त्यांनी प्रत्यक्ष पाहिले होते, अनुभवले होते. त्यांनी ब्रिटिशांना आणि काँग्रेसला आदिवासी प्रश्न समजावून सांगितला. आदिवासींमधील लोकप्रियता वाढल्याने त्यांना 'मरांग गोमके' (सर्वोच्च नेता) असे म्हटले जाऊ लागले. संविधान सभेत त्यांचा प्रवेश झाला तेव्हा मूलभूत हक्कांबाबत असलेली सल्लागार समिती तसेच अल्पसंख्याकांकरता आणि आदिवासींकरता असलेल्या समितीमध्ये त्यांचा समावेश झाला. मुंडा यांनी केलेली मांडणी ही तेव्हाच्या संविधान सभेत सर्वांना चक्रावून टाकणारी होती. आपण सिंधू संस्कृतीचे वंशज असून हजारो वर्षांपासून सर्वाधिक अन्याय आदिवासींवर झाला आहे, हे सांगतानाच ते म्हणाले, आदिवासींना लोकशाही प्रक्रिया शिकवण्याचा तुम्ही लोक प्रयत्न करत आहात; मात्र मुळातच लोकशाही प्रक्रियेनुसार जगणारे लोक आदिवासी जमातीमधील आहेत. आदिवासींना लोकशाही शिकवण्याऐवजी तुम्ही आदिवासींकडून लोकशाही मूल्ये शिकली पाहिजेत, असे त्यांचे आग्रही प्रतिपादन होते. संविधान सभेतील अनेकांसाठी मुंडा यांच्या मांडणीने सांस्कृतिक धक्का बसला मात्र वादविवादात आदिवासींबाबतचे मूलभूत प्रश्न मुंडा मांडू शकले, हे विशेष. अश्विनी कुमार पंकज यांनी संपादित केलेल्या 'आदिवासीडम' (२०१७) या पुस्तकात जयपाल सिंग मुंडा यांचे निवडक लेख आणि भाषणे आहेत. जयपाल सिंग यांनी स्वातंत्र्योत्तर काळातही महत्त्वाची भूमिका बजावली. मुख्य म्हणजे जल, जंगल आणि जमिनीसोबतचे आपले पूर्वीपासूनचे नाते सांगत जयपाल सिंग आयुष्यभर आदिवासींचे प्रश्न मांडत राहिले. जसिंता केरकेट्टा नावाची कवयित्री म्हणते,

"वे हमारे सभ्य होने के इंतजार में है
और हम उनके मनुष्य होने के !"

जयपाल सिंग मुंडा यांचा प्रयत्न इतरांना माणूसपणाच्या वाटेवर आणण्याचा होता. त्यांच्यामुळे संविधान सभेत 'हूल जोहार'च्या (विद्रोही अभिवादन) घोषणेचा नाद निनादत राहिला.

– डॉ. श्रीरंजन आवटे
poetshriranjan@gmail.com

Scanned with OKEN Scanner